## संभाजीनगरच्या वाळूज परिसरात
# जिल्हा परिषद निवडणुकीसाठी बोगस मतदान

### संजय शिरसाट यांचा आरोप



■ वृत्तसंस्था, छत्रपती संभाजीनगर, दि. ७ :

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात जिल्हा परिषद निवडणुकीसाठी उत्साहात मतदान सुरू आहे. अनेक मतदान केंद्रांवर मतदारांच्या रांगा लागल्याचे चित्र आहे. मात्र, पालकमंत्री संजय शिरसाट यांनी वाळूज परिसरात बोगस मतदान होत असल्याचा गंभीर आरोप केला आहे. दुपारी दीड वाजेपर्यंत जिल्ह्यात सरासरी ४० टक्के मतदान नोंदवले गेले.

पालकमंत्री संजय शिरसाट यांनी अनेक मतदान केंद्रांना भेटी दिल्या. यावेळी कार्यकर्त्यांनी त्यांच्याकडे बोगस मतदानासंदर्भात तक्रारी केल्या. शिरसाट यांच्या मते, शहराच्या भावसिंगपुरा परिसरातून लोकांना बसमधून भरून आणण्यात आले होते. काही ठिकाणी मृत उमेदवारांच्या नावानेही मतदान झाल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकरणी पोलीस आयुक्तांकडे तक्रार दाखल केल्याचे शिरसाट यांनी सांगितले.

दुपारी दीड वाजेपर्यंत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एकूण ५ लाख २२ हजार मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला होता. सकाळी ११:३० वाजेपर्यंत जिल्ह्यात १९ टक्के मतदान झाले होते, ज्यात ३ लाख ५४ हजार लोकांनी मतदान केले होते. मतदारांमध्ये निवडणुकीबद्दल मोठा उत्साह दिसून येत आहे. छत्रपती संभाजीनगर तालुक्यात एका ९३ वर्षीय आजींनी जिल्हा परिषदेच्या शाळेतील मतदान केंद्रावर जाऊन आपला मतदानाचा हक्क बजावला.

## वडिलांसोबत मतदानाला गेलेल्या
# मुलाने दाबले ईव्हीएमचे बटन

■ वृत्तसंस्था,
छत्रपती संभाजीनगर, दि. ७ :

राज्यातील 12 जिल्हा परिषदा आणि त्या अंतर्गत येणाऱ्या 125 पंचायत समितींसाठी आज (7 फेब्रुवारी) सकाळी 7.30 वाजता मतदानाला सुरुवात झाली. अलिबागमध्ये ईव्हीएममध्ये तांत्रिक बिघाड झाल्याच्या तक्रारींमुळे मतदानाची प्रक्रिया प्रभावित झाली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार विलास भुमरे यांनी मतदान करताना त्यांच्या लहान मुलालाही सोबत उभे केले. विशेष म्हणजे, त्यांच्या बोटांवर शाई लावली गेल्यानंतर मुलाच्या बोटावरही कर्मचाऱ्यांनी शाई लावली, ज्यामुळे वाद निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्याचबरोबर, अकलूजच्या



यशवंतनगर मतदान केंद्रावर जिल्हा परिषद उमेदवार अर्जुन सिंग मोहिते पाटील यांच्या लहान मुलाने ईव्हीएमचे बटन दाबल्याची घटना घडली. अर्जुन सिंग मोहिते पाटील म्हणाले की, मुलाला मतदान कसे होते हे पाहायचे होते, मात्र अधिकाऱ्यांच्या समक्ष हा प्रकार घडला असल्याने कोणतीही तक्रार नोंदवली गेली नाही. या प्रकारामुळे मतदारांमध्ये आश्चर्य व्यक्त झाले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अधिकृत उमेदवार
# सुनिता बुट्टे यांच्या पतीवर जीवघेणा हल्ला

### जिल्हा परिषद निवडणुकीला गालबोट

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :

राज्यभरात जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांसाठी मतदानाची रणधुमाळी सुरू असताना पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातून धक्कादायक घटना समोर आली आहे. आंबेठाण पाईट येथील जिल्हा परिषद गटात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तणावाचे वातावरण निर्माण झाले असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अधिकृत उमेदवार सुनिता बुट्टे यांच्या पतीवर अज्ञात व्यक्तींनी जीवघेणा हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. ही घटना मतदान सुरू असतानाच घडल्याने परिसरात खळबळ उडाली असून निवडणूक प्रक्रियेच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

हल्ल्यात गंभीर जखमी झालेले शरद बुट्टे पाटील हे माजी जिल्हा परिषद सदस्य तसेच माजी गटनेते म्हणून ओळखले जातात. काही दिवसांपूर्वीच त्यांनी भाजपतून बाहेर पडत अजित पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. त्यांच्या राजकीय वाटचालीतील हा बदल आणि निवडणुकीच्या तोंडावर घडलेला हल्ला यामुळे या प्रकरणाला अधिक संवेदनशीलता प्राप्त झाली आहे. हल्ल्यानंतर त्यांना तातडीने वासुली फाटा येथील बालाजी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून डॉक्टरांचे पथक त्यांच्या प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे.

प्राथमिक माहितीनुसार, शरद बुट्टे खासगी कामानिमित्त बाहेर गेले असताना दबा धरून बसलेल्या काही हल्लेखोरांनी अचानक त्यांच्यावर हल्ला चढवला. हल्लेखोरांनी धारदार शस्त्रांचा वापर केल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. हल्ल्यानंतर परिसरात अफरातफर उडाली आणि नागरिकांनी तत्काळ मदतीला धाव घेत त्यांना रुग्णालयात हलवले. त्यांच्या डोक्याला तसेच शरीराच्या इतर भागांना गंभीर दुखापत झाल्याचे सांगितले जात असून त्यांच्यावर सध्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. सध्या प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळत असली तरी वैद्यकीय पथक सतर्क आहे.

या घटनेनंतर आंबेठाण पाईट आणि आसपासच्या परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे. निवडणूक काळात अशा प्रकारची घटना घडल्याने राजकीय वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी या हल्ल्याचा निषेध करत दोषींवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. मतदानाच्या दिवशी घडलेल्या हिंसक घटनेमुळे मतदारांमध्येही भीतीचे वातावरण पसरल्याचे दिसून येत आहे.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून तपास सुरू केला आहे. हल्लेखोरांची ओळख पटवण्यासाठी सीसीटीव्ही फुटेज, प्रत्यक्षदर्शींची माहिती आणि इतर तांत्रिक साधनांचा आधार घेतला जात आहे. प्राथमिक अंदाजानुसार हा हल्ला जुन्या वादातून किंवा राजकीय कारणातून झाला असावा, असा कयास पोलिसांकडून व्यक्त केला जात आहे. मात्र, नेमके कारण स्पष्ट होण्यासाठी सखोल तपास आवश्यक असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. दरम्यान, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. मतदान केंद्रांवर बंदोबस्त असतानाही मतदानाच्या दिवशीच अशा प्रकारची घटना घडल्याने प्रशासनाच्या तयारीवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. नागरिकांकडून निवडणूक काळात अधिक कडक सुरक्षा व्यवस्था राबवावी, अशी मागणी होत आहे. विशेषतः संवेदनशील भागांमध्ये अतिरिक्त पोलिस बंदोबस्त ठेवण्याची गरज व्यक्त केली.

## अजितदादांची इच्छा पूर्ण करणार?



■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ७ :

बारामती जिल्हा परिषद निवडणुकीसाठी मतदान केल्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना रोहित पवार यांनी पवार कुटुंबाच्या एकजुटीबाबत आणि सुनेत्रा पवार यांच्या भूमिकेबाबत महत्त्वपूर्ण विधान केले. सगळ्या पवार कुटुंबाने एकत्र यावे, ही अजितदादांची मनापासूनची इच्छा होती. अजितदादांची जागा कोणीही घेऊ शकत नाही; मात्र एक परिवार म्हणून मला सुनेत्रा काकींमध्ये अजितदादांचेच प्रतिबिंब दिसते, असे ते म्हणाले. पुढे त्यांनी स्पष्ट केले की, सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रीपदासह अजितदादांकडील सर्व खाती मिळावीत, ही त्यांची इच्छा होती आणि आता त्या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष व्हाव्यात, अशी भूमिका त्यांनी मांडली.

रोहित पवारांनी सांगितले की, अजितदादांचे स्वप्न हे पवार कुटुंब एकत्र राहावे, असेच होते. या दिशेने दादांकडून प्रयत्न सुरू होते. सुप्रिया ताई, पवार साहेब आणि आम्ही सर्वजणही तसाच प्रयत्न करत होतो, असे त्यांनी नमूद केले. दुर्दैवी घटनेनंतर गेल्या 13 दिवसांत कुटुंब एकत्र असल्याचेही त्यांनी सांगितले. कुठलाही पूर्वनियोजित कार्यक्रम नसताना काटेवाडीत श्रीनिवास पवार, पार्थ पवार आणि सुनेत्रा पवार एकत्र मतदानासाठी आले, हे त्या एकजुटीचे उदाहरण असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

पवार साहेबांनी (शरद पवार) अलीकडेच जय पवार आणि कुटुंबातील इतर सदस्यांना मार्गदर्शन केल्याचेही रोहित पवार यांनी सांगितले. हे मार्गदर्शन भावनिक स्वरूपाचे होते आणि अजितदादांच्या स्मरणार्थ काही गोष्टी पुढील काळात करण्याबाबत चर्चा झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पवार साहेबांच्या मनात एखादी गोष्ट आली की, ते आम्हाला बोलावून मार्गदर्शन करतात, असे ते म्हणाले.

# अजित पवारांच्या अंगरक्षकाच्या बलिदानाची दखल घ्या

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ७ :

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातात मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या सोबत कर्तव्य बजावत असलेले अंगरक्षक विदीप जाधव यांचाही दुर्दैवी अंत झाला. या पार्श्वभूमीवर माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते अनिल देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून विदीप जाधव यांच्या पत्नीला शासन सेवेत कायमस्वरूपी सामावून घेण्याची मागणी केली आहे. जाधव कुटुंबावर आलेल्या संकटाची दखल घेत मानवतावादी दृष्टिकोनातून तातडीने निर्णय घ्यावा, अशी विनंती या पत्रातून करण्यात आली आहे.



28 जानेवारी 2026 रोजी घडलेल्या विमान दुर्घटनेत अजित पवार यांच्यासोबतच त्यांचे निष्ठावान अंगरक्षक विदीप जाधव यांचेही निधन झाले. या घटनेनंतर दुसऱ्याच दिवशी अनिल देशमुख यांनी सातारा जिल्ह्यातील फलटण तालुक्यातील तरडगाव येथे जाऊन जाधव कुटुंबीयांची भेट घेतली. सांत्वनपर भेटीदरम्यान कुटुंबाने विदीप यांच्या पत्नीच्या नोकरीबाबतची व्यथा मांडली. त्यावेळी संध्या जाधव यांनी स्वतःचे निवेदन देशमुख यांना दिले होते.

# राष्ट्रवादी हा स्वतंत्र पक्ष, बाहेरील हस्तक्षेपाची गरज नाही

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ७ :

अजित पवार यांच्या आकस्मिक निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमधील घडामोडींवर सुरू असलेल्या चर्चांमध्ये वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी ठाम भूमिका मांडली आहे. दादांच्या अचानक जाण्याने मीटिंग कोणी बोलवायची? जर सुनील तटकरे प्रदेशाध्यक्ष आणि प्रफुल्ल पटेल कार्याध्यक्ष असतील, तर त्यांनी जबाबदारी उचलली तर ते व्हिलन कसे ठरू शकतात? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला. राष्ट्रवादी हा स्वतंत्र पक्ष असल्याचे अधोरेखित करत,



बाहेरील हस्तक्षेपाची गरज नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आम्ही दुःखात असताना विनाकारण टीका का केली जाते? असा भावनिक सूरही त्यांच्या वक्तव्यात उमटला.

मुश्रीफ यांनी सांगितले की, अपघातानंतर कुटुंबीयांची स्पष्ट इच्छा होती की सुनेत्रा पवार यांनी लवकरात लवकर उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घ्यावी. पवार कुटुंब पुरोगामी विचारांचे असल्याने तिसऱ्या दिवसाचे विधी पूर्ण झाल्यानंतर चौथ्या दिवशी शपथविधी पार पडला, असे त्यांनी नमूद केले. ज्या नेत्याने मला 30-40 वर्षे सांभाळले, त्यांच्या निधनानंतर मी जे घडले तेच सांगितले, असे म्हणत त्यांनी आपल्या भूमिकेचे समर्थन केले. या प्रक्रियेला राजकीय रंग देणे चुकीचे असल्याचेही त्यांनी सूचित केले.

विलीनीकरणाच्या चर्चांबाबत विचारले असता मुश्रीफ यांनी स्पष्ट केले की, त्या चर्चांमध्ये मुख्यत्वे अजित पवार सहभागी होते. आम्ही कोणीही प्रमुख व्यक्ती नव्हतो, असा दावा त्यांनी केला. पुढे ते म्हणाले, जर सुनेत्रा वहिनी, कुटुंबीय आणि पक्षातील सर्व नेते एकत्रीकरणाच्या मताचे असतील, तर अडथळा येण्याचे कारण नाही. पक्ष जो निर्णय घेईल, तीच माझी भूमिका असेल.

विमान अपघाताच्या चौकशीसंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री आणि केंद्र सरकारने सुरू केलेल्या तपासावर विश्वास व्यक्त केला. ब्लॅक बॉक्स सापडला आहे. त्यातून चित्र स्पष्ट होईल.

## मालेगाव मनपात चौथ्या
# मजल्यावरून लिफ्ट कोसळली

■ महासागर प्रतिनिधी,
मालेगाव, दि. ७ :



मालेगाव महानगरपालिका इमारतीत आज एका भीषण अपघातातून मोठी जीवितहानी टळली आहे. महापौर आणि उपमहापौर निवडीची प्रक्रिया सुरू असतानाच महापालिका इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून १८ प्रवाशांसह असलेली लिफ्ट अचानक खाली कोसळली. सुदैवाने, ही लिफ्ट तळमजल्यापर्यंत न जाता पहिल्या मजल्याच्या दरवाज्यात अडकल्याने मोठा अनर्थ टळला आणि लिफ्टमधील सर्वजण सुखरूप राहिले.

आज महापालिकेत नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीचा उत्साह असताना ही घटना घडली. लिफ्टमध्ये क्षमतेपेक्षा जास्त भार (१८ नागरिक) झाल्याने आणि अचानक लिफ्टची चैन तुटल्याने ही दुर्घटना घडली. चौथ्या मजल्यावरून लिफ्ट वेगाने खाली येत असताना ती पहिल्या मजल्यावर अडकली. लिफ्ट कोसळल्याच्या आवाजाने आणि नागरिकांच्या ओरडण्याने महापालिका परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल आणि पोलिसांनी तातडीने धाव घेतली. लिफ्ट पहिल्या मजल्यावर अशा ठिकाणी अडकली होती की तिचा दरवाजा उघडणे तांत्रिकदृष्ट्या कठीण होते. अखेर बचाव पथकाने पहिल्या मजल्यावरील भिंत तोडून विशेष प्रयत्नाने अडकलेल्या नागरिकांना सुखरूप बाहेर काढले.

या लिफ्टमध्ये 'इस्लाम पार्टी'चे नेते आसिफ शेख, मुश्तकिन डिग्निटी यांच्यासह काही नवनियुक्त नगरसेवक आणि पाच पत्रकारांचा समावेश होता. सर्वांची सुखरूप सुटका झाल्यानंतर प्रशासनासह राजकीय नेत्यांनी आणि नागरिकांनी सुटकेचा श्वास घेतला आहे. लिफ्ट जर आदळली असती, तर त्यातून स्फोट होण्याचीदेखील शक्यता होती. पण सुदैवाने असे काही झाले नाही. लिफ्टमधील सर्वांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले आहे. या लिफ्टची देखभाल डागडुजी झाली नव्हती, यामुळे घटना घडल्याचे म्हटले जात आहे.

## पैशावर किती मतदार घेता येतील
## त्या याद्या व्हॉट्सअ‍ॅपवर टाका



धाराशिव : निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एक कथित ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाली असून, त्यातून खळबळ उडाली आहे. या क्लिपमध्ये माजी मंत्री तानाजी सावंत यांच्या नावाचा उल्लेख होत असल्याचा दावा केला जात आहे. मतदानाच्या दिवशी मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी पैशांचा वापर करण्याबाबत चर्चा ऐकू येत असल्याचा आरोप होत आहे. या ऑडिओमधील संभाषणामुळे निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. व्हायरल होत असलेल्या या कथित ऑडिओमध्ये कोटी-दोन कोटी खर्च करावा लागला तरी चालेल, अशा आशयाची वाक्ये ऐकू येत असल्याचा दावा केला जात आहे. मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी आर्थिक साधनांचा वापर करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे या क्लिपच्या आधारे बोलले जात आहे. विशेष म्हणजे, मतदारांची माहिती आणि शक्यता याबाबतच्या याद्या थेट व्हॉट्सअ‍ॅपवर पाठवण्याचे निर्देश दिल्याचेही ऐकू येत असल्याचे सांगितले जात आहे. या संभाषणात हिंगणगावसह काही भागांतील मतदारांची संभाव्यता तपासून त्यानुसार काम करण्याबाबत चर्चा झाल्याचा आरोप आहे. पैशावर किती मतदार घेता येतील, त्या याद्या व्हॉट्सअ‍ॅपवर टाका, अशा स्वरूपाच्या सूचनांचा उल्लेख केला जात आहे. कोणत्याही प्रकारची माहिती बाहेर न जाण्याची खबरदारी घेत फक्त डिजिटल माध्यमातून संपर्क साधण्यास सांगितल्याचेही या क्लिपमध्ये असल्याचे बोलले जात आहे.

## तेलंगणात महात्मा फुलेंची मूर्ती तोडण्याचा प्रयत्न

### हा दलित, आदिवासी, ओबीसींवर हल्ला

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :

तेलंगणातील संगारेड्डी जिल्ह्यातील तेल्लापूर गावात महात्मा जोतिबा फुले यांची मूर्ती तोडण्याचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमागे आरएसएसचा हात असल्याचा खळबळजनक आरोप प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. "हा केवळ जोतिबा फुलेंवर झालेला हल्ला नसून, तो दलित, आदिवासी, ओबीसी आणि सामाजिक न्यायाच्या चळवळीवर झालेला हल्ला आहे," अशा शब्दांत प्रकाश आंबेडकरांनी आपला संताप व्यक्त केला आहे. या घटनेवर प्रतिक्रिया देताना प्रकाश आंबेडकर यांनी आरएसएसवर घणाघाती टीका केली. ते म्हणाले, "आरएसएसला महात्मा



जोतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेशी द्वेष आहे. वंचित आणि बहुजनांच्या समतेच्या आंदोलनाला चिरडण्याचा हा प्रयत्न आहे. आरएसएसला दलित, आदिवासी आणि ओबीसींबद्दल आकस आहे; त्यांना केवळ मनुवाद आणि ब्राह्मणवादाचेच प्रेम आहे." प्रकाश आंबेडकर यांनी तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

## लाडक्या बहिणींना ३१ मार्चपर्यंत ई-केवायसी करण्यास मुदतवाढ

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :

मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांसाठी राज्य सरकारने एक महत्त्वाचा आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. ज्या महिलांनी ई-केवायसी करताना अर्जात तांत्रिक किंवा माहितीविषयक चुका केल्या होत्या, त्यांना आता आपली माहिती सुधारण्यासाठी ३१ मार्च २०२६ पर्यंत पुन्हा एकदा संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

लाडकी बहीण योजनेत अनेक अपात्र महिलांनी या योजनेचा लाभ घेतल्याचे सरकारच्या निदर्शनास आल्यानंतर पात्र महिलांची खातरजमा करण्यासाठी राज्य सरकारने ३१ डिसेंबरपर्यंत ई-केवायसी बंधनकारक केली होती. लाभार्थी महिलांसाठी अर्ज प्रक्रिया पूर्ण करताना लाभार्थीच्या कुटुंबातील कोणताही सदस्य सरकारी विभाग/उपक्रम/मंडळ, भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेत नियमित, कायमस्वरूपी अथवा कंत्राटी कर्मचारी म्हणून कार्यरत नाही, तसेच सेवानिवृत्तीनंतर निवृत्तिवेतन घेत नाही या अटीसंदर्भात ऑनलाइन पर्याय निवडताना काही प्रकरणांत चुकून चुकीचा पर्याय निवडला गेल्याचे निदर्शनास आले आहे.

# रमाई जयंती उत्साहात साजरी




■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :

नॅशनल इंग्लिश हायस्कूल अंड ज्युनियर कॉलेज मानखुर्द येथे मातोश्री रमाबाई आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली या कार्य कर्माचे प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.स्वपनील सोनवणे व सज्जाद मापारी सर तसेच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अँड सुनील भोवते व वसुंधरा शिर्के मैडम तसेच शाळेचे डायरेक्टर म्हणून योगेश तानाजी सानप यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांनी आपल्या परीने मातोश्री रमाई यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. इयत्ता 9 वी च्या इकरा सना उला चौधरी या विद्यार्थ्यांनीने रमाई संघर्षा विषयी माहिती दिली रमाई सारखी दुसरी रमाई होणे शक्य नाही, असे मोलाचे विचार मांडले. तसेच दक्ष प्रकाश प्रजपती या विद्यार्थ्याने बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. तसेच अनुष्का अशोक शिंदे शेन गोऱ्यातुन निर्माण झालेल्या संघर्षा विषयी माहिती दिली. रजनी परुळे यांनी एक चांगला समाज घडावा. या विषयी मातोश्री रमाबाई आंबेडकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. तसेच समाधान साबळे यांनी जिवन एक संघर्ष आहे.

# एसटी कर्मचाऱ्यांचा राज्यभर बंदचा इशारा

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ७ :

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील (एसटी) कर्मचाऱ्यांच्या पूरक भत्त्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास राज्यभर एसटी बस सेवा बंद आंदोलन छेडण्याचा इशारा कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी दिला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या भत्ता प्रश्नाकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

एसटी कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या मासिक पूरक भत्त्यासंदर्भात राज्य शासनाच्या अर्थ विभागाने ११ डिसेंबर १९९८ रोजी आदेश काढून आगारांची वर्गवारी निश्चित केली होती. या वर्गवारीनुसार अ-१ वर्गातील आगारांमधील कर्मचाऱ्यांना दरमहा ३०० रुपये, तर अ वर्गातील आगारांमध्ये सहा हजार रुपयांपेक्षा अधिक मूल वेतन असलेल्या कर्मचाऱ्यांना २४० रुपये पूरक भत्ता देण्याची तरतूद करण्यात



आली होती. मात्र प्रत्यक्षात गेल्या दोन दशकांपासून कर्मचाऱ्यांना जुन्या दरानुसार केवळ ६५ रुपये भत्ता दिला जात असल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य एसटी कामगार संघटनेने केला आहे.

संघटनेचे पदाधिकारी दिलीप परब आणि सागर दिघे यांनी सांगितले की, पुणे विभागातील कर्मचाऱ्यांना नियमानुसार २४० रुपये पूरक भत्ता मिळणे अपेक्षित असताना तो आजही दिला जात नाही. तसेच छत्रपती संभाजीनगर येथील आगार ब वर्गात मोडत असताना, ब-२ श्रेणीनुसार मिळणाऱ्या १२० रुपयांऐवजी केवळ २५ रुपये भत्ता देण्यात येत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. यामुळे हजारो कर्मचाऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचा दावा संघटनेने केला आहे.

हा प्रश्न केवळ एका विभागापुरता मर्यादित नसून सोलापूर, पुणे तसेच राज्यातील इतर अनेक भागांतील एसटी कर्मचाऱ्यांनाही तो भेडसावत आहे. नियमांनुसार भत्ता देण्यात यावा, यासाठी संघटनांनी वेळोवेळी शासनाकडे निवेदने दिली, पत्रव्यवहार केला आणि बैठका घेतल्या; मात्र अद्याप कोणताही ठोस निर्णय झालेला नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी वाढत आहे.या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीने सकारात्मक भूमिका न घेतल्यास राज्यभर एसटी बस सेवा बंद आंदोलन करण्याचा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

या संभाव्य आंदोलनाचा सर्वाधिक फटका ग्रामीण आणि निमशहरी भागातील प्रवाशांना बसण्याची शक्यता असून, दररोज एसटीवर अवलंबून असलेल्या प्रवाशांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

## अजित पवारांच्या मृत्यूवर संशय घेतला तर अस्वस्थ का होता?

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ७ :



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी शनिवारी अजित पवारांच्या अपघाती निधनावरून पुन्हा एकदा भाजपला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयत्न केला आहे. अजित पवारांच्या मृत्यूवर लोकांनी संशय घेतला तर तुम्ही का अस्वस्थ होता? पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात विरोधक आंदोलन करताना त्यांच्यावर हत्येच्या कटाचा संशय घेतला जातो. पण आम्ही अजितदादांच्या संशयास्पद मृत्यूवर काहीही बोलायचे नाही, ही मुस्कटदाबी नाही का? त्यात तुमचा काही हात आहे का? असे संजय राऊत यांनी म्हटले आहे.

संजय राऊत यांनी शनिवारी सकाळी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी संसदेतील विरोधकांची मुस्कटदाबी, अजित पवारांचा संशयास्पद मृत्यू, राष्ट्रवादी काँग्रेसचे कथित विलीनीकरण आदी विविध मुद्यांवरून सत्ताधारी भाजपला खडेबोल सुनावले. ते म्हणाले, आमदार रोहित पवार हे दिवंगत अजित पवार यांचे पुतणे आहेत. पवार कुटुंबाचे घटक आहेत. त्यामुळे त्यांनी विलीनीकरण व अजित पवार यांचा अपघात याविषयी बोलणे अधिक विश्वासार्ह असेल.

# अजित पवारांच्या निधनानंतर बारामतीत पोटनिवडणुकीची तयारी

### आयोगाने जाहीर केला विशेष मतदारयादी पुनरीक्षण कार्यक्रम

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ७ :

अजित पवार यांच्या विमान अपघातात झालेल्या निधनानंतर बारामती विधानसभा मतदारसंघातील राजकीय परिस्थिती झपाट्याने बदलली आहे. या पार्श्वभूमीवर रिक्त झालेल्या जागेसाठी पोटनिवडणुकीची प्रक्रिया गतीमान करण्यासाठी निवडणूक आयोगाने तयारी सुरू केली आहे. आयोगाकडून या मतदारसंघासाठी विशेष संक्षिप्त मतदारयादी पुनरीक्षण कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून, या प्रक्रियेमुळे मतदारयादी अद्ययावत, अचूक आणि पारदर्शक राहावी, हा प्रमुख उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

28 जानेवारी रोजी झालेल्या विमान अपघातात अजित पवार यांचे निधन झाले होते. त्यानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. या घटनांनंतर बारामतीतील आमदारपद रिक्त झाले असून, पोटनिवडणुकीचा मार्ग मोकळा करण्यासाठी निवडणूक आयोगाने कायदेशीर चौकटीत पावले उचलली आहेत. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, 1950 मधील कलम 21 अंतर्गत हा विशेष कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

या कार्यक्रमानुसार 1 जानेवारी 2026 पर्यंत नाव नोंदणीकृत असलेले मतदारच पोटनिवडणुकीत मतदानासाठी पात्र असतील. त्यामुळे ज्यांची नावे अद्याप मतदारयादीत नाहीत किंवा दुरुस्ती आवश्यक आहे, अशा नागरिकांसाठी ही महत्त्वाची संधी मानली जात आहे. मतदारयादीतील त्रुटी दूर करून प्रक्रिया पारदर्शक ठेवण्याचा आयोगाचा प्रयत्न असल्याचे अधिकाऱ्यांनी नमूद केले आहे.

कार्यक्रमाच्या वेळापत्रकानुसार सोमवार, 9 फेब्रुवारी 2026 रोजी एकत्रित प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध केली जाईल. त्यानंतर 9 फेब्रुवारी ते 25 फेब्रुवारी या कालावधीत मतदारांकडून दावे आणि हरकती स्वीकारल्या जाणार आहेत. या टप्प्यात मतदारांना नाव समाविष्ट करणे, चुकीची माहिती दुरुस्त करणे किंवा वगळलेल्या नावांबाबत हरकत नोंदवण्याची संधी उपलब्ध होणार आहे. प्राप्त दावे व हरकतींची सखोल छाननी करून त्या 6 मार्च 2026 पर्यंत निकाली काढण्यात येतील. या प्रक्रियेनंतर मंगळवार, 10 मार्च 2026 रोजी अंतिम मतदारयादी जाहीर केली जाईल. या अंतिम यादीच्या आधारे बारामती विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक घेण्याचा मार्ग अधिकृतपणे मोकळा होईल.

दरम्यान, या संपूर्ण प्रक्रियेची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी पुणे जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी तसेच बारामती मतदार नोंदणी अधिकारी यांच्या स्तरावर विशेष बैठकांचे आयोजन करण्यात येणार आहे. या बैठकीत मान्यता प्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना बोलावून कार्यक्रमाची सविस्तर माहिती देण्यात येईल.

# चुकीच्या उपचार व निष्काळजीपणामुळे एक वर्षाच्या चिमुकल्याचा मृत्यू, बालरोगतज्ज्ञ डॉक्टरवर गंभीर आरोप




## दोषी डॉक्टरवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशिम** - शहरातील एका खासगी बाल रुग्णालयात कथित चुकीच्या उपचारांमुळे व वैद्यकीय निष्काळजी पणामुळे अवघ्या एक वर्ष एक महिन्याच्या चिमुकल्याचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली असून, संबंधित डॉक्टरवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. या प्रकरणी मृत बालकाच्या आईने वाशिम शहर पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे.

तक्रारदार अंजली आदेश वाकुडे यांनी दिलेल्या तक्रारी नुसार, त्यांचा मुलगा सारंश आदेश वाकुडे (वय १ वर्ष १ महिना) यास दि. ९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी सुमारे १० वाजताच्या सुमारास उलट्यांचा त्रास सुरू झाल्याने वाशिम येथील डॉ. विजय कानडे यांच्या बाल रुग्णालयात उपचाराकरिता दाखल करण्यात आले होते. तक्रारी नुसार, सुरुवातीचे तीन दिवस मुलावर जनरल वॉर्डमध्ये उपचार सुरू होते. चौथ्या दिवशी मुलाची प्रकृती अचानक खालावल्याने डॉक्टरांनी निमोनिया झाल्याचे तसेच लाल व पांढऱ्या पेशी वाढल्याचे सांगत बालकाला अतिदक्षता विभागात (ICU) हलविले. उपचार शासकीय योजने अंतर्गत करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. मात्र, योजने अंतर्गत अधिक निधी मिळावा या उद्देशाने बालकास हायडोज उपचार दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या कथित हायडोज उपचारांमुळे मुलाची प्रकृती अधिक गंभीर झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले असून, अखेर दि. १८ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास डॉ. कानडे यांनी बालकास अकोला येथे रेफर केले. त्यानंतर बालकास अकोला येथील आर्बिट हॉस्पिटल मध्ये दि. १८ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता दाखल करण्यात आले. तेथे डॉ. दायमा व इतर डॉक्टरांनी दि. २३ जानेवारी पर्यंत उपचार केले. प्रकृतीत सुधारणा न झाल्याने त्याच दिवशी दुपारी ३ वाजता पुढील उपचारासाठी डॉ. शिरीष देशमुख यांच्या दवाखान्यात दाखल करण्यात आले. सर्वतोपरी उपचार सुरू असता नाही दि. ३० जानेवारी २०२६ रोजी रात्री ८ वाजताच्या सुमारास चिमुकल्या सारंशचा दुर्दैवी मृत्यू झाला. तक्रारी नुसार, बालकाला सुरुवातीला किरकोळ आजार होता; मात्र चुकीचे उपचार, वैद्यकीय निष्काळजीपणा आणि अनावश्यक हायडोज उपचारांमुळेच बालकाचा जीव गेल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी वाशिम शहर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवून योग्य ती चौकशी करण्यात यावी, दोषी डॉक्टर आढळल्यास त्यांच्यावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा, वैद्यकीय सनद जप्त करावी तसेच ॲट्रॉसिटी कायद्यान्वयेही गुन्हा दाखल करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. ही मागणी पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे वाशिम जिल्हाध्यक्ष दौलतराव हिवराळे, ऑल इंडिया ब्लू टायगर सेनेचे संस्थापक अध्यक्ष जगदीश मानवतकर, अखिल भारतीय मातंग महासंघाचे राज्य कार्याध्यक्ष संजय भाऊ वैरागडे, राजकुमार पडघान, माधव डोंगरदिवे, रामदास कालापाड, अक्षय इंगोले यांच्यासह उपस्थित नातेवाईक व आंबेडकरी कार्यकर्त्यांनी केली आहे. या घटनेमुळे वाशिम जिल्ह्यात खळबळ उडाली असून, खासगी रुग्णालयांतील उपचार पद्धती व शासकीय योजनांच्या अंमल बजावणी बाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

# घोटा, चिखली व पंचक्रोशीत वन्य प्राण्यांचा हैदोस

## शेतकऱ्यांचा वाली कोण ? वनविभागही सुस्त

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**रिसोड** - येथून जवळच असलेल्या कोणत्यानही कोणत्या कारणाने प्रसिद्ध असलेले घोटा- चिखलीसह कवठा सर्कल मधील अनेक गावात व तालुक्यामध्ये अनेक भागात शेतामध्ये वन्यप्राणी शेती पिकाचे मोठे नुकसान करीत आहेत. अन्नाच्या शोधात रात्री रानडुकराद्वारे गहू हरभरा, सह काढणीला आलेल्या उभ्या पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केले जात आहे.

डुकरे रात्रीच्या वेळेस शेतात घुसून पिकाची नासधूस करीत असल्याने शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. दिवसभर शेतात राबून रात्री डुकरा पासून पिकाची राखण करण्याची वेळ शेतकऱ्यावर आली आहे. उभी पिक फस्त करून वन्य प्राणी शेतकऱ्यांच्या हाताशी आलेला घास हिसकावून घेत आहेत. या नुकसानीमुळे शेतकरी हतबल झालेला आहे. कमी पर्जन्यमानात मोठ्या कष्टाने अनेक अडचणींना सामोरे जात शेतकऱ्यांनी शेती फुलवलेली आहे. त्यामुळे या दिवसा पासून रात्रभर जागरण करून, राहिलेल्या पिकांचे राखण करण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी डुकरांच्या त्रासामुळे ज्वारी पिक पेरणी बंद केली आहे. शेतकऱ्यांचा का कोणीच नाही स्थानिक लोक प्रतिनिधींना शेतकऱ्यांचे प्रश्न दिसत नाहीत का? शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रशासनाने या डुकरांच्या बंदोबस्त करून शेतकऱ्यांच्या अडचणी व प्रश्नावर लवकर तोडगा काढावा व वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करावा अशी तीव्र मागणी शेतकरी करीत आहेत.



डुक्कर, रोही, हरण, वानर, मुळे रात्री बे रात्री शेतीची रखवाली करून सुद्धा शेती पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. तरी शासनाने याचा लवकरात लवकर बंदोबस्त लावावा व झालेल्या नुकसानाची नुकसान भरपाई लवकरात लवकर देण्यात यावी..
(दिपक मापारी, शेतकरी चिखली)

मी माझ्या शेतात २ एकर हरभरा पेरला तेव्हा पासून सतत ३० दिवस शेतात रखवाली करून सुद्धा डुकरांनी हरभरा पिकाचे नुकसान केले. करावे तरी काय करावे हा प्रश्न मला पडला आहे. तरी शासनाने मला झालेल्या नुकसानीची नुकसान भरपाई द्यावी.
-(किशोर मोरे, शेतकरी घोटा)

# संत सेवालाल महाराज जयंतीनिमित नियोजन बैठक उत्साहात

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मानोरा** - संत सेवालाल महाराज जयंतीनिमित्त मिरवणूक रॅली संदर्भात दि. ७ फेब्रुवारीला शासकीय विश्रामगृह येथे नियोजन आढावा बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीला गोर बंजारा समाजाचे नायक, कारभारी व युवकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही दि. १४ फेब्रुवारी रोजी मानोरा शहरात मिरवणूक रॅली काढण्यात येणार आहे. शहरातील राहूल पार्क मधील संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व हार अर्पण करून रॅली मिरवणूक संत सेवालाल महाराज चौक, दिग्रस चौक मार्गे नाईक नगर पर्यंत काढण्यात येणार आहे. नाईकनगर येथे महाप्रसाद कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे.. या नियोजन बैठकीत विविध विषयावर चर्चा करून या धार्मिक कार्यक्रमात सेवा भक्त समाज बांधवाची गैरसोय होणार नाही, याचा आढावा घेण्यात आला. तसेच दरवर्षी प्रमाणे यावर्षीही सेवा भक्ताना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले. या बैठकीला धर्मराज महाराज, उमेश चव्हाण, अनिल राठोड, बंडू राठोड, वसंतराव राठोड, महेश राठोड, विशाल राठोड, महेश जाधव, नितीन राठोड, रोहीत राठोड आदीसह समाज बांधवांची उपस्थिती होती.



# महिला सक्षमीकरणासाठी मालेगाव येथे आढावा बैठक संपन्न

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मालेगाव** - प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष बच्चुभाऊ कडू यांच्या संकल्पनेतून तसेच प्रहार महिला आघाडी वाशिम जिल्हा अध्यक्षा सौ. सीमाताई सुरोशे यांच्या अध्यक्षतेखाली शेतकरी वेल्फेअर संघटनेच्या सहकार्याने मालेगाव येथे महिलांना सक्षम व व्यावसायिक बनविण्यासाठी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले.

योजनांची माहिती व प्रत्यक्ष व्यवसायाच्या संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. बैठकीत प्रहार महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सौ. सीमाताई सुरोशे यांनी महिलांना संबोधित करताना सांगितले की, 'आजच्या काळात महिला सक्षम होणे ही केवळ गरज नसून काळाची मागणी आहे. स्वयंरोजगार, लघुउद्योग, बचतगट, प्रशिक्षणाधारित व्यवसाय या माध्यमातून महिलांनी स्वतःचा आर्थिक पाया मजबूत केला पाहिजे.' त्यांनी महिलांना व्यवसाय सुरू करताना लागणारे नियोजन, शासकीय योजनांचा लाभ, कर्जसुविधा व बाजार पेठेची माहिती यावर सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी श्री धम्माभाऊ इंगळे व श्री प्रशांतजी सर यांनीही महिलांसाठी उपलब्ध असलेल्या विविध स्वयंरोजगाराच्या संधी, प्रशिक्षण योजना, उत्पन्नवाढीचे पर्याय व यशस्वी महिलांच्या उदाहरणांद्वारे उपस्थित महिलांना प्रेरणा दिली. महिलांनी संघटित होऊन एकत्रितपणे व्यवसाय केल्यास यश निश्चित मिळते, असे मत त्यांनी व्यक्त केले.

या आढावा बैठकीस महिला सक्षमीकरण समितीच्या विविध पदाधिकारी, केंद्रप्रमुख तसेच मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. उपस्थित महिलांनी या उपक्रमाचे स्वागत करत अशा मार्गदर्शक बैठका सातत्याने आयोजित करण्याची मागणी केली.

# कामरगावात गाय-वासरांची सर्रास चोरी! मध्यरात्री तवेरा-डिझायरचा थरार, पोलीस यंत्रणा अपयशी

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**कारंजा**- कामरगाव (ता. कारंजा लाड) कामरगाव परिसरात गाय व वासरांची चोरी अक्षरशः उद्योग धंद्यासारखी सुरू असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. रात्री बारा वाजताच्या सुमारास तवेरा व स्विफ्ट डिझायर अशा आलिशान गाड्यांमधून दोन ते तीन संशयित येऊन रस्त्यावर बसलेल्या गाई-वासरांना उचलून नेत असल्याचे प्रकार सातत्याने घडत आहेत. २५ देवगाई, ४ मालकी हक्काच्या गाई व ६ वासरांची चोरी झाल्याने शेतकरी व नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

काल दिनांक २ फेब्रुवारी २०२६ रोजी महादेव नगर येथे गाय चोरीचा थरारक प्रकार घडला. स्विफ्ट डिझायर गाडीमध्ये गाई व वासरे कोंबण्याचा प्रयत्न सुरू असतानाच परिसरातील जागरूक तरुण मुरली ठवकर, अजय कैकाडी, पवन कैकाडी व सतीश भोंडे यांनी प्रसंगावधान राखत चोरांना पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र परिस्थितीचे गांभीर्य पाहता चोरटे घटनास्थळावरून पळ काढण्यात यशस्वी झाले. या प्रकाराची माहिती तरुणांनी तत्काळ पोलीस चौकीत दिली. मात्र धक्कादायक बाब म्हणजे, पोलीस चौकीत केवळ एकच पोलीस कर्मचारी उपस्थित असल्याने रात्री तक्रार नोंदवून तातडीची कारवाई होऊ शकली नाही. परिणामी चोरटे मोकाट सुटले आणि कामरगावात चोरीचे धाडस अधिकच वाढले आहे. गावात वाढत असलेल्या या गंभीर गुन्हेगारी घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, कामरगाव पोलीस स्टेशनला तात्काळ अतिरिक्त गस्त घालणारी पोलीस टोळी उपलब्ध करून द्यावी, रात्रीची नियमित गस्त वाढवावी व गाय-वासरांच्या चोरीवर कठोर कारवाई करावी अशी गावकऱ्यांची जोरदार व रास्त मागणी होत आहे. प्रशासनाने वेळीच दखल न घेतल्यास परिस्थिती हाताबाहेर जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



# कैलास शिंदे यांना पीएच.डी.पदवी प्रदान

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मालेगाव** - छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून तालुक्यातील पांगरखेडा येथील शेतकरी कुटुंबातील कैलास चंद्रकांत शिंदे यांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे.

त्यांनी भौतिकशास्त्र या विषयात आपले संशोधन कार्य यशस्वीरीत्या पूर्ण केले. डॉ. कैलास शिंदे यांच्या संशोधन कार्यासाठी अंबेजोगाई येथील योगेश्वरी महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. आर. जे. टोपरे यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या सखोल मार्गदर्शनामुळे, अभ्यासपूर्ण सूचनांमुळे तसेच संशोधनातील अनुभवाच्या जोरावर हा प्रबंध यशस्वीरीत्या पूर्ण होऊ शकला, असे डॉ. कैलास शिंदे यांनी सांगितले. हे संशोधन कार्य त्यांनी माधवराव पाटील महाविद्यालय व संशोधन केंद्र, मुरूम येथे पूर्ण केले. आपल्या शैक्षणिक यशाचे श्रेय देताना डॉ. कैलास शिंदे यांनी ही पीएच.डी. पदवी आपले वडील चंद्रकांत प्रल्हाद शिंदे, आई सुनीता शिंदे, मार्गदर्शक डॉ. आर. जे. टोपरे तसेच कुटुंबीयांना समर्पित केल्याचे नमूद केले. तसेच संशोधन काळात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य करणारे मित्र, सहकारी व शुभेच्छुकांचे मनःपूर्वक आभार त्यांनी व्यक्त केले. या उल्लेखनीय यशाबद्दल डॉ. कैलास शिंदे यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.



# राजगांव येथे माता रमाई यांची जयंती साखर पान वाटून साजरी

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशीम** - दि. ७ फेब्रुवारी रोजी बुद्ध विहार राजगांव येथे महिला समता सैनिक दल यांच्या वतीने माता रमाई जंयती साजरी करतात आली . कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पोलीस पाटील विजयराव जाधव होते.

मान्यवरांच्या हस्ते महाकारुणीक तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या पुतळ्याचे व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे तसेच त्यागमुर्ती माता रमाई यांच्या प्रतिमेचे पुजन समता सैनिक दलाच्या अध्यक्षा शारदा जाधव व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर त्रिशरण पंचशील प्रदान करण्यात आले. त्यानंतर त्यागमुर्ती रमाई यांच्या जीवन कार्याचा परिचय देत रमाईचा स्वाभिमान , सहनशीलता आणि त्याग याचा आदर्श आजच्या महिलांनी अंगीकारावा या बाबत पोलीस पाटील यांनी आपल्या भाषणातून उपस्थितांना केले. भाषणा नंतर संपूर्ण गावात वाजत गाजत साखर - पान आणि जिलाबी चे वाटप करण्यात आले . शेवटी भ.बुद्धाच्या पुतळ्या जवळ बुद्ध विहारात धम्म पालन गाथा घेवून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली . रात्री १२.०० वाजता केक कापून गाणे म्हणून देखील त्यागमुर्ती माता रमाई जंयतीचा हर्ष उल्हास केला होता .या कार्यक्रमासाठी महिला समता सैनिक दलाच्या अध्यक्षा ,उपाध्यक्षा , सचिव , कोषाअध्यक्षा , सदस्या आणि सर्व पदाधिकारी उपस्थित होते , सिद्धार्थ जाधव , अशोक जाधव ,प्रविण जाधव , भानुदास अवचार , उपासक उपसिका मोठया संख्येने उपस्थित होते . सदर कार्यक्रम शांततेत व हर्ष उल्हासात साजरा झाला.



# शेतकऱ्याला 'आत्महत्या करा' असा सल्ला; केनवडमध्ये नायब तहसीलदारांचा धक्कादायक प्रकार, पत्रकारांना कारवाईची धमकी; प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

▶ फिरोजशाह ▶

**केनवड** - एकीकडे शासन शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी विविध योजना, मदतीचे पॅकेज आणि जनजागृती करत असल्याचे चित्र आहे. मात्र दुसरीकडे, त्याच शासनातील अधिकारी शेतकऱ्यांना चक्क 'आत्महत्या करा' असा सल्ला देत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे हा प्रकार कृषिमंत्र्यांचे पालकत्व असलेल्या जिल्ह्यात घडल्याने प्रशासनाच्या संवेदनशीलतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या घटनेमुळे केनवड परिसरातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचा सूर पाहायला मिळत आहे.

प्रकरण आहे रिसोड तालुक्यातील केनवड येथील शेतकरी गुलाबराव दांडगे यांचे गट क्रमांक ४८१ मधील १ हेक्टर ४१ आर शेतजमीन असून, त्या शेतात जाण्यासाठी गट क्रमांक ४८७ च्या शेताच्या शिवेवरून पूर्वीपासून वहिवाटीचा रस्ता आहे. मात्र गैर अर्जदार यांनी हा रस्ता नांगरणी करून तसेच काटे लावून बंद केल्याची तक्रार दांडगे यांनी केली होती. या अन्यायाबाबत दांडगे यांनी सुमारे नऊ ते दहा महिन्यांपूर्वी तहसीलदार, रिसोड यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनुसार तहसील कार्यालयात अर्जदार व गैर अर्जदार यांची सुनावणी सुरू होती. तहसील कार्यालयाकडून दोन्ही पक्षांना ६ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रकरणाची अंतिम तारीख असल्याचे सांगण्यात आले होते. त्या दिवशी महसूल अधिकारी व कर्मचारी प्रत्यक्ष पाहणी करून पुढील आदेश पारित करणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले होते.

ठरलेल्या दिवशी नायब तहसीलदार हे घटनास्थळी पोहोचले व त्यांनी संपूर्ण प्रकरणाची पाहणी केली. मात्र पाहणीनंतर त्यांनी 'आणखी तारखा दिल्या जातील आणि प्रकरण लांबेल' असे सांगितल्याने आधीच त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांचा संयम सुटला. यावेळी गुलाबराव दांडगे यांचा मुलगा योगेश यांनी भावनिक होत, 'असेच चालू राहिले तर मला आत्महत्या करण्याची वेळ येईल,' असे म्हटले यावर नायब तहसीलदारांनी थेट 'आत्महत्या करा' असे उत्तर दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. शेतकऱ्याला न्याय देण्याऐवजी असा सल्ला देणे अत्यंत निंदनीय असल्याची प्रतिक्रिया शेतकरी व नागरिकांमधून व्यक्त होत आहे. दरम्यान, या घटनेचे वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांनी संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारला असता, त्यांनी पत्रकारांनाच धमकावल्याचा आरोप आहे. 'शूटिंगसाठी परवानगी घेतली आहे का?' असा सवाल करत 'शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी कारवाई करू' अशी धमकी देण्यात आल्याने पत्रकारितेच्या स्वातंत्र्यावरही प्रश्न उपस्थित झाले आहेत. विशेष म्हणजे काही महिन्यांपूर्वी याच प्रकरणाच्या पाहणीसाठी तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर या केनवड गावापर्यंत आल्या होत्या; मात्र ऐनवेळी घटनास्थळी न जाता परत फिरल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणात संशयाचे भोवरे अधिक गडद झाले असून 'या प्रकरणात काहीतरी गडबड आहे का?' असा थेट सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.



'माझी गट नं. ४८१ मधील १ हे. ४१ आर. जमीन असून तिला पूर्वीपासून वहिवाटीचा रस्ता आहे. तो रस्ता गैर अर्जदाराने बंद केला आहे. याबाबत मी तहसीलदारांकडे तक्रार केली. अनेक सुनावण्या झाल्या. अखेर नायब तहसीलदार पंचनाम्यासाठी आले. सर्व पुरावे आणि शेजारील शेतकरी उपस्थित असताना देखील अहवाल तत्काळ न करता प्रकरण आणखी लांबवण्याचे सांगण्यात आले. यामुळे माझ्या मुलाने हताश होऊन आत्महत्येबाबत बोलला असता साहेबांकडून 'हो करा' असे सांगण्यात आले. ही अतिशय निंदनीय बाब आहे. न्याय न मिळाल्यास मी वरिष्ठांकडे तक्रार व उपोषण करणार आहे.' **– गुलाबराव दांडगे, शेतकरी, केनवड**

सदर दिलेल्या तक्रारीनुसार आम्ही पंचनामा करण्याकरिता शेतात पोहोचलो. सत्यता पडताळून मंडळ अधिकारी तलाठी व कोतवाल यांच्या समक्ष आम्ही अहवाल तयार केला. परंतु यात अर्जदार यांचे सांगणे होते की, गैर अर्जदार त्यांच्या शेतात विहीर घेत आहे . अर्जदाराने गैर अर्जदाराला काही वर्षपूर्वी त्याची शेती विकली होती. आता गैर अर्जदार विकत घेतलेल्या त्या शेतीमध्ये विहीर घेत आहे शासनाची विहिरीकरिता मदत देखील मंजूर झालेली आहे परंतु अर्जदारांचे म्हणणे आहे की तू त्या शेतात विहीर घेतली तर माझ्या शेतात असलेल्या विहिरीचे पाणी कमी होईल त्यामुळे घेऊ नको. या वादातून गैरअर्जदाराने रस्ता अडवलेला आहे. त्यामुळे अर्जदाराचे म्हणणे होते की तुम्ही अहवालामध्ये विहिरीचा देखील समाविष्ट करा परंतु आम्ही सांगितले की तुमची तक्रार रस्त्याची आहे. आम्ही त्याबाबत आम्ही अहवाल सादर करू. तसेच त्या ठिकाणी असलेल्या पत्रकाराला त्या ओघात मी काही चुकीच बोललो असल्यास दिलगिरी व्यक्त करतो. - **तुळशीराम कुळमेथे नायब तहसीलदार रिसोड**

'पंचनाम्यासाठी महसूल कर्मचारी आल्याची माहिती मिळाल्यावर मी घटनास्थळी पोहोचलो. काही कर्मचाऱ्यांनी ओळखपत्र लावले नव्हते, याबाबत मी विचारणा केली. यावर नायब तहसीलदार चिडले व माझे आयडी कार्ड मागितले. आयडी दाखवल्यानंतर शेतकऱ्याला आत्महत्येचा सल्ला दिल्याचा प्रकार घडला. मी त्यावर प्रश्न विचारताच मला शासकीय कामात अडथळा आणल्याची धमकी देण्यात आली. हा पत्रकाराची मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न आहे.' **– राम वानखेडे, पत्रकार, केनवड**

# रिसोड तालुक्यात अवैध वृक्षतोडीचा धुमाकूळ वनविभागाचे दुर्लक्ष,पर्यावरणाचा ऱ्हास

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**रिसोड** - तालुक्यातील वनक्षेत्रात आणि महसूल विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या भागांत गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर अवैध वृक्षतोड सुरू आहे. लाकूड तस्कर मौल्यवान झाडांची कत्तल करत असून, याकडे वनविभागाचे पूण 'पणे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसत आहे. यामुळे तालुक्यातील पर्यावरणाचा समतोल ढासळण्याची भीती व्यक्त होत आहे .



रिसोड तालुक्यातील या परिसरातील वन जमिनीवर असलेली अनेक वर्षांची जुनी झाडे तोडली जात आहेत. ही लाकडे ट्रॅक्टर आणि छुप्या मार्गाने बाहेर नेली जात असल्याची माहिती स्थानिकांनी दिली आहे. विशेष म्हणजे, ज्या भागात ही वृक्षतोड सुरूआहे, तिथे वनरक्षकांची गस्त नसल्या सारखीच आहे वनविभागाचा वचक कमी झाल्याने लाकूड तस्करांचे धाडस वाढले आहे. केवळ खाजगी शेतातीलच नव्हे, तर राखीव वनक्षेत्रातील झाडांवरही कुऱ्हाड चालवली जात आहे. नियमा नुसार झाड तोडण्यासाठी वनविभागाची परवानगी आवश्यक असते, मात्र येथे कोणत्याही परवानगी शिवाय दिवसा ढवळ्या काही ठिकाणी वृक्षतोड सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. एकीकडे सरकार 'झाडे लावा, झाडे जगवा' असा नारा देत असताना, दुसरीकडे डोळ्या देखत होत असलेल्या या वृक्ष तोडीवर वनविभागाचे अधिकारी कोणतीही ठोस कारवाई का करत नाहीत? असा सवाल ग्रामस्थ विचारत आहेत. या वृक्षतोडीत वनविभागाचे काही कर्मचारी सामील आहेत का? अशी शंकाही आता उपस्थित केली जत आहे या बेसुमार वृक्ष तोडीमुळे तालुक्यातील पावसाचे प्रमाण कमी होणे, जमिनीची धूप होणे आणि वन्य प्राण्यांचा मानवी वस्तीकडे येण्याचा धोका वाढला आहे. जर ही वृक्षतोड अशीच सुरू राहिली, तर तालुक्यातील डोंगर उघडे पडायला वेळ लागणार नाही. या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन वरिष्ठ वन अधिकाऱ्यांनी संबंधित भागात चौकशी करावी आणि अवैध वृक्षतोड करणाऱ्या तस्करांवर कडक गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी पर्यावरण प्रेमी आणि तालुक्यातील नागरिकांनी केली आहे.

# यश मोरे लॉ विषयातून नेट उत्तीर्ण

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**रिसोड** - येथील प्रसिद्ध वकील ॲड. शरद विश्वनाथ मोरे यांचे सुपुत्र यश शरद मोरे यांनी विधी (Law) विषयातून राष्ट्रीय पात्रता परीक्षा (NET) उत्तीर्ण करून घवघवीत यश संपादन केले आहे.

मूळचे रिसोड तालुक्यातील सवड गावचे रहिवासी असलेले ॲड. शरद विश्वनाथ मोरे हे रिसोड दिवाणी न्यायालयात वकिली व्यवसाय करतात. त्यांचे सुपुत्र यश यांनी देशातील अत्यंत कठीण समजली जाणारी आणि 'युजीसी' (UGC), नवी दिल्ली यांच्या मार्फत



३१ डिसेंबर २०२५ रोजी घेण्यात आलेली सहाय्यक प्राध्यापक पदासाठीची राष्ट्रीय पात्रता परीक्षा (NET) पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण केली आहे. यश यांनी त्यांचे विधी शाखेतील उच्च शिक्षण (LLB/LLM) पूर्ण केले असून, पहिल्याच प्रयत्नात हे यश मिळवल्या बद्दल त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक व अभिनंदन होत आहे. त्यांच्या या यशामुळे रिसोड तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. यांचा आदर्श विविध क्षेत्रात तयारी करणा-या विद्यार्थानी घेऊन मेहनत चिकाटीने अभ्यास केल्यास यश हमखास मिळते हे निश्चित करावे यश शरद मोरे हे माजी. नगराध्यक्ष दिवंगत बाबुराव जुमडे यांचे नातु आहेत.

# वसंतनगर पोहरादेवी येथे भव्य जंगी शंकरपट उत्साहात संपन्न देवा चिन्म्या आणि 'मल्हार-पिस्टन'ची बाजी

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मानोरा** - ज्योतिबाबा उत्सव मंडळ, वसंतनगर पोहरादेवी यांच्या वतीने संत सेवालाल महाराज जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेला 'भव्य जंगी शंकरपट' मोठ्या उत्साहात पार पडला. दोन दिवस चाललेल्या या थरारक स्पर्धेत विदर्भातील नामांकित बैलजोड्यांनी आपला वेग आणि शिस्त दाखवत हजारो प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. अटीतटीची फायनल आणि निकाल स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी 'अ' आणि 'क' गटातील अंतिम सामने पार पडले. यामध्ये सेकंदाच्या फरकाने विजेते ठरवण्यात आले.



**'अ' गट (प्रथम श्रेणी):**

प्रथम क्रमांकः कार्तिक अनिल राठोड (पारवा) यांच्या 'देवा आणि चिन्म्या' या जोडीने ७.११ सेकंदात अंतर कापत प्रथम क्रमांकाचे ५१,००० रुपयांचे बक्षीस पटकावले. द्वितीय क्रमांकः साईनाथ उन्हाळे (दांडेगाव) यांच्या 'सर्जा आणि बटन' या जोडीने देखील ७.११ सेकंदाचीच वेळ नोंदवली, मात्र तांत्रिक निकषां नुसार त्यांना द्वितीय क्रमांकावर समाधान मानावे लागले.

**'क' गटः**

प्रथम क्रमांकः अतिश वर्मा (वाशिम) यांच्या 'मल्हार आणि पिस्टन' या जोडीने ७.२ सेकंदात धाव पूर्ण करून प्रथम क्रमांक मिळवला. प्रमुख उपस्थिती आणि सत्कार माजी पंचायत समिती सदस्य विजय अनंतकुमार पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच बलदेव महाराज, निलेश बलदेव राठोड (वाई), गणेश पुरुषोत्तम जाधव, अनिल हरिदास नाईक आणि आदित्य अविनाश राठोड ,जयचंद परसराम राठोड, भोला सुनील चव्हाण या मान्यवरांनी उपस्थित राहून विजेत्यांचा उत्साह वाढवला. स्पर्धेचे अचूक वेळेचे नियोजन (घड्याळ वाले) श्याम राठोड (दगडथर) यांनी चोख बजावले.

**कार्यकर्त्यांचे विशेष परिश्रम**

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी ज्योतिबाबा उत्सव मंडळाच्या कार्यकर्त्यांनी दिवसरात्र मेहनत घेतली. यामध्ये रमेश राजाराम चव्हाण, अनिकेत अनिल नाईक, श्रीनाथ अविनाश राठोड, निलेश रमेश जाधव, जयकुमार राठोड, विशाल किशोर चव्हाण, रोशन दिलीप चव्हाण, निखिल प्रदीप चव्हाण, विशाल श्रीराम जाधव, रोशन मंगल जाधव, विकास सुखदेव चव्हाण, सावन संतोष जाधव, विक्रम लालसिंग राठोड, अक्षय गोकुळ चव्हाण, जितेश उत्तम राठोड, उमेश तुकाराम जाधव आणि समस्त ग्रामवासी वसंतनगर पोहरादेवी यांचा मोलाचा वाटा होता.

# उर्दू कन्या शाळेत बोअरवेल खोदकामाचे उद्घाटन विद्यार्थिनींच्या पाण्याच्या प्रश्नाला दिलासा



महासागर प्रतिनिधी ▶

कारंजा लाड - येथील नगर परिषद उर्दू कन्या शाळेत विद्यार्थिनींसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसल्याने त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. ही समस्या शाळेचे मुख्याध्यापक शेख मन्नान यांनी शिक्षण सभापती जाकीर शेख यांच्याकडे मांडली. त्यानंतर शिक्षण सभापती जाकीर शेख यांनी AIMIM चे प्रदेश उपाध्यक्ष युसूफ सेठ पुंजानी यांच्या सोबत चर्चा केली. युसूफ सेठ पुंजानी यांनी तत्काळ सकारात्मक प्रतिसाद देत शाळेत बोअरवेल करून देण्याचे आश्वासन दिले. त्यानुसार आज नगर परिषद उर्दू कन्या शाळा परिसरात बोअरवेल खोदकाम पूर्ण करण्यात आले असून त्याचे उद्घाटन शिक्षण सभापती जाकीर शेख यांच्या हस्ते करण्यात आले.या कार्यक्रमाला नगर परिषद कारंजाचे उपाध्यक्ष फिरोज शेकुवाले, बांधकाम सभापती हुसैन बंदुकवाले, महिला व बालकल्याण सभापती ॲड. सुभान खेतीवाले, नियोजन सभापती नदीम राज, नगरसेवक समिउल्ला खान, रहेमत ठेकेदार, सलमान विराणी, इमरान पारेख, शेख शोहेब, अब्दुल एजाज, नईम भाई, समाज सेवक युनूस पहेलवान, मजीद भाई कंडक्टर तसेच सहा प्रशासन अधिकारी शेख छोटू सर, मुख्याध्यापक शेख मन्नान सर, सय्यद आबिद सर आणि शेख सादिक सर उपस्थित होते. बोअरवेलमुळे शाळेतील विद्यार्थिनींच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागला असून पालक व शिक्षकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# शून्यातून उभारले यशस्वी शेळीपालन,सुशिक्षित बेरोजगार तरुणाची प्रेरणादायी वाटचाल

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मालेगाव** - आजच्या ग्रामीण वास्तवात रोजगाराच्या संधी मर्यादित असल्या तरी मेहनत, चिकाटी आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर यशाची नवी वाट तयार करता येते. पशुपालन हा केवळ जोडधंदा न राहता शाश्वत उत्पन्नाचा मजबूत आधार ठरू शकतो, हे रिसोड तालुक्यातील चिखली येथील संदिप कुंडलिक काळे यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे.



**संभ्रमातून उमलले स्वप्न**

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर रोजगाराच्या शोधात संदिप यांच्या मनात अनेक प्रश्न होते. अनुभवाचा अभाव, आर्थिक मर्यादा आणि अनिश्चित भविष्य असूनही त्यांनी हार मानली नाही. शेतीला जोडधंदा म्हणून काहीतरी ठोस, टिकाऊआणि स्वावलंबन देणारे करायचे, या विचारातून शेळीपालनाची कल्पना आकार घेऊ लागली आणि त्यातूनच नव्या प्रवासाची सुरुवात झाली.

**मार्गदर्शनाचा आधार**

सुरुवातीला काय करावे, कसे करावे, कुठून सुरुवात करावी, या सगळ्या प्रश्नांनी गोंधळ उडाला होता. याच टप्प्यावर पशुसंवर्धन विभागातील पशु वैद्यकीय दवाखाना, चिखली येथील पशुधन पर्यवेक्षक डॉ. सतीश खरात यांचे मार्गदर्शन लाभले. योग्य जात निवड, शेडची रचना, चारा व्यवस्थापन आणि आरोग्य काळजी या प्रत्येक टप्प्यावर मिळालेल्या सल्ल्याने आत्मविश्वास वाढत गेला.

**अल्प भांडवल, मोठी जिद्द**

शेळीपालन सुरू करताना भांडवल ही मोठी अडचण होती. बँकेकडून एक लाख पन्नास हजार रुपयांचे कर्ज घेतले. उपलब्ध साधनसामग्रीतून साधे पण उपयोगी शेड उभारले. अर्धा एकर क्षेत्रावर मका पेरला, नेपियर गवताची लागवड केली. शेतातील तुरी व हरभऱ्याचे कुटार साठवून चाऱ्याची गरज भागवली.

**शास्त्रीय व्यवस्थापनाची जोड**

मार्गदर्शनानुसार राजस्थान येथून सिरोही जातीच्या दहा शेळया व एक बोकड खरेदी करण्यात आला. सुरुवातीला हिरव्या चाऱ्याची कमतरता असल्याने वाळलेला चारा, कुटार आणि झाडपाला वापरण्यात आला. अनुभव वाढत गेला तसे नेपियर, बाहुबली व्ही-१२, बिल्डर्स बाबू दशरथ, मेथीघास, कृष्णा घास, हादगा अशा विविध चाऱ्यांची लागवड करण्यात आली.

**काळजीपूर्वक संगोपन**

पशु वैद्यकीय दवाखान्यामार्फत सर्व शेळयांची ऑनलाईन नोंदणी झाली. नियमित जंतनिर्मूलन, गोचीड निर्मूलन तसेच अंत्रविषार, घटसर्प, पीपीआर यांसारख्या रोगांवरील लसीकरण करण्यात आले. गोठ्याची नियमित स्वच्छता व फवारणी केली जाते.

सकाळ-संध्याकाळ वाळलेला चारा, दुपारी हिरवा चारा दिला जातो. गाभण बकऱ्यांसाठी विशेष आहार दिला जातो. नवजात करडांसाठी स्वतंत्र जाळीदार शेड उभारून प्रेमाने आणि काळजीने संगोपन केले जाते.

यशाचा आलेख वर चढताना

योग्य व्यवस्थापनामुळे शेळयांची वाढ उत्तम झाली. अवघ्या चौदा महिन्यांत प्रत्येक शेळी दोन वेळा व्याली. संख्या साठ ते पासष्टपर्यंत पोहोचली. जागे अभावी टप्प्या टप्प्याने सत्तेचाळीस शेळयांची विक्री करण्यात आली. यातून दोन लाख तीस ते दोन लाख चाळीस हजार रुपयांपर्यंत उत्पन्न मिळाले. सध्या सुमारे पंचवीस हजार रुपये मासिक उत्पन्न शेळीपालनातून मिळत असून घरखर्च भागवूनही बचत होत आहे. शून्यातून उभा राहिलेला हा व्यवसाय आज कुटुंबाचा भक्कम आधार बनला आहे.

**प्रेरणादायी ठसा**

या यशस्वी वाटचालीमुळे गावातील इतर शेतकरी व तरुण शेळीपालनाकडे आशेने पाहू लागले आहेत. पशुसंवर्धन विभागाशी संपर्क साधून अनेक जण या व्यवसायात पाऊल टाकत आहेत. गावात स्वावलंबनाची नवी चळवळ उभी राहत आहे.

**मनातून उमटलेला संदेश**

'शून्यापासून सुरुवात केली तरी ठाम निश्चय आणि मेहनतीची तयारी असेल तर यश दूर नसते. अल्प भांडवलातही योग्य नियोजन आणि मार्गदर्शन मिळाल्यास पशुपालनातून निश्चित यश मिळू शकते'.

उद्याची दिशा पुढील काळात शेळीपालन व्यवसाय दोनशे ते अडीचशे शेळयांपर्यंत वाढवण्याचा निर्धार आहे. राष्ट्रीय पशुधन अभियान योजनेंतर्गत मार्गदर्शन सुरू असून, भविष्यात तीन एकर चारा लागवड, कडबा कटर यंत्र आणि नवीन शेड उभारणी करण्याचा त्यांचा मानस आहे.

- **जिल्हा माहिती कार्यालय वाशिम**

# कारंजा तालुक्यात अमली पदार्थांचा सुळसुळाट तरुणाई व्यसनाच्या विळख्यात

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**कारंजा** - तालुक्यात शहरासह ग्रामीण भागात अमली पदार्थांची खुलेआम विक्री सुरू असल्याचे चित्र समोर येत आहे. गांजा, ड्रग्स यांसारख्या नशेच्या पदार्थांमुळे तरुणाई व्यसनाधीन होत असून त्यातून अपघात आणि गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ होत असल्याची गंभीर बाब पुढे आली आहे.



मात्र, या सर्व प्रकारांकडे पोलीस प्रशासन बघ्याची भूमिका घेत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास डळमळीत झाला आहे. कारंजा शहरातील शाळा- महाविद्यालयीन विद्यार्थीही ड्रग्स व गांजाच्या विळख्यात अडकत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. शहरात अमली पदार्थांची विक्री करणारी टोळी सक्रिय असल्याची चर्चा असून, हे सर्व प्रकार पोलिसांच्या नजरेत का येत नाहीत, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. विशेष म्हणजे अल्पवयीन मुलेही नशेच्या आहारी जात असल्याने पालकांमध्ये तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे. शहरातील बायपास रोड तसेच काही मोकळ्या ठिकाणी तरुणांनी अड्डे तयार केल्याची माहिती असून, तेथे गांजा व ड्रग्सचे सेवन करून तरुण नशेत गुंग असतात, असे नागरिक सांगतात. या ठिकाणी अनेकदा संशयास्पद हालचाली दिसून येत असून, परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. व्यसनाधीनतेला आळा बसावा, अमली पदार्थ विक्रीवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी पालक, सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांकडून सातत्याने केली जात आहे. मात्र, अद्यापही अपेक्षित ती ठोस कारवाई होत नसल्याने असंतोष वाढत आहे. तरुणांच्या आयुष्यात घोंघावत असलेल्या नशेच्या संकटावर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलीस प्रशासनाने विशेष मोहीम राबवावी, तसेच लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. विशेषतः आमदारांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन प्रशासनाला ठोस निर्देश द्यावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे..

# शुभांगी चोथमल युजीसी नेट एन्ट्रान्स पीएचडी एक्झाम उत्तीर्ण

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मालेगाव** - तालुक्यातील मेडशी येथील संजय बबनराव चोथमल यांची कन्या युजीसी नेट एन्ट्रान्स पीएचडी साठी राष्ट्रीय पात्रता परीक्षा (NET) पात्र ठरलेली असून यश संपादन केले आहे.

मूळचे मालेगाव तालुक्यातील मेडशी गावचे रहिवासी आहे. देशातील अत्यंत कठीण समजली जाणारी आणि 'युजीसी' (ळउण), नवी दिल्ली यांच्यामार्फत ७ जानेवारी २०२५ रोजी घेण्यात आलेली सहाय्यक प्राध्यापक पद, जेआरएफ आणि पीएचडी राष्ट्रीय पात्रता परीक्षा (NET) पहिल्याच प्रयत्नात पीएचडी प्रवेश मिळवलेला आहे. शुभांगी हिने



तिचे उच्च शिक्षण (MA Marathi) आर. ए कॉलेज वाशिम येथे पूर्ण केले असून, पहिल्याच प्रयत्नात हे यश मिळवल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक व अभिनंदन होत आहे. त्यांच्या या यशामुळे मालेगाव तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# आत्मशक्तीच्या जोरावर यशाची झेप,वाशिमच्या १२ वर्षीय विराजची ५३ व्या राज्यस्तरीय बाल वैज्ञानिक विज्ञान प्रदर्शनासाठी निवड

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशिम** - वाशिमकरांचा लाडका बाल समुपदेशक व लेखक म्हणून ओळख असलेल्या अवघ्या १२ वर्षीय विराज शिंदे याची ५३ व्या राज्यस्तरीय बाल वैज्ञानिक विज्ञान प्रदर्शना साठी (दिव्यांग श्रेणी) निवड झाली आहे. ही निवड वाशिम जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरत आहे.

श्री. ज्ञानेश्वर माऊली विद्यालय, कोंडाळा महाली येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात वाशिमचे बहुपरिचित विधान परिषद सदस्य किरणराव सरनाईक तसेच माध्यमिक शिक्षणाधिकारी मंगला धुपे यांच्या हस्ते विराजला पारितोषिक



देऊन गौरविण्यात आले होते. विशेष म्हणजे, विराजची इन्स्पायर नॅशनल साठी यापूर्वीच निवड झाली आहे. मेडिकल ट्रीटमेंट, सर्जरी अशा अनेक अडचणींवर मात करत आत्मविश्वास आणि इच्छा शक्तीच्या जोरावर पुढे जाता येते, हे विराजने आपल्या यशातून सिद्ध करून दाखवले आहे. सायन्स, मॅथ, विविध स्पर्धा परीक्षा, कला, संगीत आणि खेळ अशा सर्वच क्षेत्रांत त्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. आय. एस. टी. एस.ई. या प्रतिष्ठित टॅलेंट स्पर्धेत विराजने आंतरराष्ट्रीय क्रमांक ९ मिळवला आहे. ई. आय. असेट या नॅशनल टॅलेंट स्पर्धा परीक्षेत त्याला कांस्य पदक प्राप्त झाले आहे. रामानुज मॅथ चॅलेंज या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत यावर्षी त्याने राष्ट्रीय क्रमांक ११ पटकावला आहे. तसेच एलिमेंट्री ड्रॉईंग परीक्षेत त्याला अ श्रेणी प्राप्त झाली आहे. विराजने सायन्सवर आधारित तयार केलेली दोन्ही मॉडेल्स समाजाच्या हितासाठी उपयुक्त ठरणारी आहेत. या यशा मागे समन्वयक विजय भड व भास्कर सर यांच्या मार्गदर्शनाचा मोठा वाटा असल्याचे मत विराजने नमूद केले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल विराजचे सर्वत्र कौतुक होत असून, त्याच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# पाकिस्तानातील बलुचिस्तान प्रश्न आणि भारताची संतुलित भूमिका

दक्षिण आशियातील राजकारण हे केवळ भारत-पाकिस्तान संबंधांपुरते मर्यादित नसून, पाकिस्तानच्या अंतर्गत अस्थैर्याचे प्रतिबिंब असलेल्या बलुचिस्तान प्रश्नामुळे ते अधिक गुंतागुंतीचे बनले आहे. पाकिस्तानच्या भौगोलिक नकाशावर सर्वात मोठा, पण राजकीय व आर्थिकदृष्ट्या सर्वाधिक उपेक्षित प्रांत म्हणून ओळखला जाणारा बलुचिस्तान, गेल्या सात दशकांपासून असंतोष, संघर्ष आणि दडपशाहीचे प्रतीक बनला आहे. या पार्श्वभूमीवर बलुचिस्तानचा ऐतिहासिक प्रवास, पाकिस्तानची भूमिका आणि भारताने घेतलेली संतुलित पण अर्थपूर्ण भूमिका समजून घेणे अत्यंत महत्वाचे ठरते.

-----------------------

१७ व्या शतकात मीर अहमद खान (प्रथम) यांनी विविध बलुच जमातींना एकत्र आणून कलात ही राजधानी बनवली. ही राजसत्ता पूर्णतः केंद्रीकृत नव्हती उलट, जमातींच्या परंपरा, सरदारांची भूमिका आणि परस्पर विचारविनिमय यावर तिची उभारणी झाली होती. त्यामुळे कलातची सत्ता दडपशाहीपेक्षा एकमतावर आधारित होती. जी त्या काळातील अनेक राजसत्तांपेक्षा वेगळी होती. या दरम्यान मुघल, पर्शियन आणि अफगाण सत्तांचा प्रभाव या प्रदेशावर अधूनमधून पडत राहिला मात्र कलातने आपली स्वतंत्र ओळख कायम ठेवली.

१९ व्या शतकात ब्रिटिश साम्राज्याने भारताच्या वायव्य सीमेच्या सुरक्षेसाठी बलुचिस्तानकडे विशेष लक्ष दिले. रशियाच्या संभाव्य विस्ताराची भीती आणि अफगाणिस्तानातील अस्थिरता या पार्श्वभूमीवर ब्रिटिशांनी कलात खानतेशी (कलातवर ह्यखानह्न पदवी धारण करणारा शासक) १८७६ मध्ये करार केला. या करारानुसार कलात खानतेला संरक्षित राज्य असा दर्जा देण्यात आला.

पुढे १९४७ मध्ये भारतझ्रपाकिस्तान फाळणीच्या वेळी बलुचिस्तान हा ब्रिटिश संरक्षित प्रदेश होता. बलुच नेत्यांच्या मते, कलात खानतेचा दर्जा इतर संस्थानांप्रमाणे नव्हता, त्यामुळे त्यावर विलयाची सक्ती लागू होत नाही. मात्र मार्च १९४८ मध्ये पाकिस्तानने लष्करी दबावाखाली बलुचिस्तानचे विलिनीकरण केले हे विलिनीकरण सर्वसमावेशक संमतीने झाले नाही, अशी तक्रार बलुच नेत्यांनी तेव्हापासूनच मांडली. परिणामी, पाकिस्तानच्या स्थापनेनंतर काही वर्षांतच बलुचिस्तानमध्ये बंडखोरीची बीजे रोवली गेली.

१९५० आणि १९६० च्या दशकात बलुचिस्तानातील असंतोष अधिक तीव्र झाला. या असंतोषाचे रूपांतर कालांतराने सशस्त्र संघर्षात झाले. १९५२ मध्ये बलुचिस्तानमधील सुई गॅस क्षेत्रातून नैसर्गिक वायू उत्पादन सुरू झाले. कराची आणि लाहोर सारख्या शहरांना अनेक दशके गॅसपुरवठा झाला. मात्र सुई परिसराला अनेक वर्षे गॅसच मिळाला नाही.



प्रा. डॉ. सतीश रा. महल्ले
९९२३५७२२२६

या सोबतच कोळसा, तांबे, सोने आणि अन्य खनिज संपत्तीने समृद्ध असलेला बलुच. मात्र या संपत्तीचा लाभ स्थानिक बलुच जनतेला मिळत नाही, ही त्यांची मुख्य तक्रार राहली. दारिद्र्य, बेरोजगारी, शिक्षणाचा अभाव आणि मूलभूत सुविधांची कमतरता या समस्येबरोबरच आर्थिक उपेक्षा, राजकीय हक्कांचा प्रश्नही गंभीर झाला.

१९५८ मध्ये जनरल अयूब खान यांनी पाकिस्तानमध्ये पहिला लष्करी उठाव करून सत्ता ताब्यात घेतली आणी त्याच वर्षी बलुचिस्तानातील स्वायत्ततेच्या मागण्या दडपण्यासाठी लष्करी कारवाई करून खान ऑफ कलात यांना अटक करण्यात आली. यामुळे बलुच समाजाचा पाकिस्तानवरील विश्वास अधिकच ढासळला. तर १९७३ हे वर्ष बलुच इतिहासातील अत्यंत निर्णायक मानले जाते.

तत्कालीन पंतप्रधान झुल्फिकार अली भुट्टो यांनी निवडून आलेले बलुचिस्तानचे प्रांतिक सरकार बरखास्त केले. यानंतर मोठ्या प्रमाणावर सशस्त्र संघर्ष पेटला. इराणच्या शाहच्या मदतीने पाकिस्तान आर्मीने बलुच बंड मोडून काढण्याचा प्रयत्न केला. त्यात हजारो बलुच नागरिक मृत्युमुखी पडले. या असंतोषातून बलुच लिबरेशन आर्मी, बलुच रिपब्लिकन आर्मी यांसारख्या संघटना उदयास आल्या.

त्यांच्या मते, पाकिस्तान सरकार आणि आर्मीने बलुचिस्तानच्या नैसर्गिक संसाधनांचा वापर देशाच्या इतर भागांसाठी केला, मात्र स्थानिक जनतेला त्याचा लाभ दिला नाही. यामुळे पाकिस्तान - बलुचिस्तान संबंध तणावपूर्ण बनले. त्या काळात भारताने या प्रश्नावर थेट भूमिका घेतली नाही. शेजारी राष्ट्राच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करण्याचा धोरणात्मक दृष्टिकोन भारताने जाणीवपूर्वक स्वीकारला होता.

२००४ मध्ये राष्ट्रपती जनरल परवेझ मुशर्रफ यांच्या काळात बलुच प्रांतावर लष्करी कारवाया अधिक तीव्र झाल्या. ऑगस्ट २००६ मध्ये बलुच नेते नवाब अकबर बुग्ती यांचा लष्करी कारवाईत मृत्यू झाला. या घटने नंतर बलुच नेत्यांनी अधिक स्वायत्तता, काहींनी तर थेट स्वातंत्र्याची मागणी करत व्यापक सशस्त्र उठाव केले.

२१ व्या शतकात, विशेषतः चीन - पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर (सीपीईसी) आणि ग्वादर बंदराच्या विकासानंतर बलुचिस्तानचे रणनीतिक महत्त्व प्रचंड वाढले. याच काळात बलुचिस्तानातील मानवाधिकार उल्लंघनाच्या घटनांकडे आंतरराष्ट्रीय स्तरावर गांभिर्याने पाहिले जाऊ लागले.

२०१६ नंतर भारताने बलुचिस्तानातील मानवाधिकार प्रश्न जागतिक व्यासपीठांवर मांडण्यास सुरुवात केली. यामागे केवळ नैतिक भूमिका नसून, काश्मीर प्रश्नावर पाकिस्तानने भारताविरोधात उचललेल्या भूमिकेला दिलेले राजनैतिक प्रत्युत्तरही होते. तर पाकिस्तानकडून भारतावर बलुच बंडखोरांना मदत केल्याचे आरोप करण्यात आले, मात्र आंतरराष्ट्रीय स्तरावर ते सिद्ध होऊ शकले नाहीत. भारताची भूमिका मात्र थेट हस्तक्षेपाची कधीच राहिलेली नाही.

भारताने बलुचिस्तानातील जनतेच्या हक्कांबाबत आणि राजनैतिक पातळीवर प्रश्न उपस्थित केले, पण कोणत्याही प्रकारच्या लष्करी किंवा गुप्त हस्तक्षेपाचे आरोप ठामपणे फेटाळले. ऐतिहासिकदृष्ट्या पाहता, भारताची भूमिका दोन सूत्रांवर आधारलेली राहिली आहे.

एकीकडे शेजारी देशाच्या सार्वभौमत्वाचा आदर राखणे, तर दुसरीकडे मानवाधिकार आणि लोकशाही मूल्यांचे रक्षण करणे, काश्मीर प्रश्नावर पाकिस्तानने आंतरराष्ट्रीय मंचावर भारताविरोधात दावा मांडल्यावर बलुचिस्तानचा मुद्दा हळूहळू जागतिक चर्चेत आणणे ही भारताची राजकीय प्रत्युत्तराची रणनीती राहली आहे.

बलुचिस्तानमध्ये नागरी प्रशासनापेक्षा पाकिस्तान आर्मीचेच वर्चस्व अधिक राहिले आहे. पाकिस्तानझ्रबलुचिस्तान संबंधांतील मूळ समस्या आजही कायम आहेत. जसे राजकीय संवादाचा अभाव, संसाधनांचे अन्याय्य वाटप आणि लष्करी दडपशाही. इतिहास साक्ष देतो की केवळ बळाच्या आधारे राष्ट्रीय एकात्मता साधता येत नाही.

भारतासाठी बलुच प्रश्न हा हस्तक्षेपाचा नसून मानवाधिकार, निरीक्षण आणि व्यापक प्रादेशिक स्थैर्याशी संबधीत विषय आहे. अखेरीस, पाकिस्तानझ्रबलुचिस्तान प्रश्नाचा तोडगा पाकिस्तानलाच शोधावा लागणार आहे. भारताची भूमिका ही इतिहासातही संयमाची आणि आजही संतुलित आहे. दक्षिण आशियातील शांतता आणि स्थैर्य यासाठी बलुचिस्तानातील असंतोषाला राजकीय संवाद व न्याय्य विकासातूनच उत्तर मिळू शकते. हीच इतिहासाची शिकवण आहे.

# 'नोटा' दरवेळी उपेक्षित!

वर्ष २०१३ पासून निवडणूक प्रशासनाने मतदारांसाठी ईव्हीएम यंत्रामध्ये सर्वात शेवटी 'नोटा' चे बटन उपलब्ध करून दिले आहे. निवडणुकीसाठी उभे राहिलेल्या मतदारांपैकी कोणताच उमेदवार आपल्याला पात्र वाटत नसेल तर 'नोटा' चे बटन दाबून मतदार मतदानाचा हक्क बजावू शकतात.

२०२४ मध्ये पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत देशभरात ६७ लाख ८८ हजार ४९२ मतदारांनी नोटाचे बटन दाबून त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात निवडणुकीत उभे राहिलेले उमेदवार पात्र नसल्याचे मत व्यक्त केले. हा आकडा याआधीच्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत २ लाख ७५ हजार १३७ ने वाढला होता. २०२४ मध्येच झालेल्या राज्याच्या विधानसभा निवडणुकीत ४ लाख ६१ हजार ८६६ मतदारांनी नोटाला मतदान करण्याचा पर्याय निवडला होता.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीच्या अंतर्गत एकट्या मुंबई जिल्ह्यात तब्बल एक लाख ३२७ मतदारांनी नोटाला मतदान केले. हा आकडा एकूण मतदानाच्या जवळपास दोन टक्के इतका आहे. अन्य महापालिका निवडणूक क्षेत्रातील जवळपास तेव्हढ्याच प्रमाणात नोटाला मतदान झाले आहे. मतदान प्रक्रियेतील 'नोटा' या पर्यायाचा मतदारांकडून वाढता वापर बरेच काही सांगून जातो.

काही मतदारसंघांमधे विजयी उमेदवाराचे मताधिक्य पाहता ते त्या मतदारसंघातील 'नोटा' मतदानाहून अल्प असल्याचे लक्षात येते.

अशा ठिकाणी 'नोटा' पर्यायाचा वापर करणाऱ्यांनी जर उमेदवारांपैकी कोणाला मतदान केले असते, तर तेथील निवडणुकांचा निकाल वेगळाच लागला असता. निवडणुकीचा निकाल लागल्यावर नोटा पर्यायाचा वापर करणाऱ्यांची संख्या सांगितली जाते; मात्र कोणताही पक्ष त्याकडे गांभीर्याने पाहत नाही, त्यामुळे निवडणूक आयोगाने उपलब्ध करून दिलेल्या 'नोटा' पर्यायाचा उद्देश साध्य होत नसल्याचे दिसून येते.

मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी निवडणूक प्रशासनासह राज्य सरकार, केंद्र सरकार, स्वयंसेवी संस्था, संघटना, राजकीय पक्ष विविध माध्यमांतून जनजागृती करत असतात. असे असतानाही बहुतांश निवडणूक क्षेत्रांमध्ये सरासरी ५० ते ६० टक्यांच्या दरम्यान मतदान होते. ४० ते ५० टक्के जनता अद्यापही मतदान करण्यासाठी घराबाहेर पडण्याची तसदी घेत नसल्याचे चित्र यंदा महापालिका निवडणुकीतही पाहायला मिळाले.

अशा स्थितीत समाजातील एक जागरूक वर्ग जो आपले राष्ट्रीय कर्तव्य म्हणून मतदानासाठी घराबाहेर पडतो, रांग लावून 'नोटा'ला मतदान करतो. अशा वर्गाचा विचार राजकीय पक्ष केव्हा करणार आहेत? या नागरिकांना आपल्याकडून काय अपेक्षित आहे, जे त्यांना देण्यामध्ये आपण कमी पडत आहोत का? आपण जो उमेदवार दिला आहे त्याची गुन्हेगारी पार्श्वभूमी नागरिकांना खटकते आहे का? निवडणूकीतील आपली प्रचाराची पद्धती या लोकांना पटत नाही का? आपल्या पक्षाची तत्वे आणि विचारधारा यांना मान्य नाही का? आपण दिलेल्या आश्वासनांची पूर्ती आपण करू यावर यांचा विश्वास नाही का? की याहून काही वेगळे कारण आहे याबाबतचे चिंतन राजकीय पक्ष करणार आहेत की नेहमीप्रमाणे लागलेल्या निकालावर संतुष्टता मानून पुढच्या निवडणुकांच्या सिद्धतेते व्यस्त होणार आहेत ?

महापालिका निवडणुकीत जे चित्र दिसले तेच चित्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्येही दिसेल यात शंका नाही. जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र म्हणून आज आपल्या देशाची ओळख आहे.

या लोकशाही राष्ट्रातील एक मोठा वर्ग नोटाचा पर्याय वापरून पक्षांनी उभे केलेल्या उमेदवारांना नाकारत आहे आणि ही मतदानाची आकडेवारी दर निवडणुकांगणिक वाढत असूनही या वर्गाचा विचारच केला जात नाही हे लोकशाहीसाठी घातक असून निवडणूक आयोगासह राजकीय पक्षांनी याबाबत गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

■ ■ ■

# इन्दोरची अर्चना अग्रवाल केस स्त्रीधनच्या विरोधात का गेली?

## सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट

सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा
सीए. आकाश जी. मुंदडा
जालना.




गेल्या काही आठवड्यात आपण स्त्रीधन च्या बाजूचे केस बघितले आज आपण बघणार आहोत की कोणत्या केस स्त्रीधनच्या विरोधात आणि महिलांच्या विरोधात का गेले?

**प्रश्न :** इन्दोरची अर्चना अग्रवाल (स्त्रीधन) ची केस काय होती व ती महिलांच्या विरोधात का गेली?

■ अर्चना अग्रवाल विरुद्ध डेप्युटी कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स या चर्चीत केस मध्ये अर्चना अग्रवाल यांच्या घरातून इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांना 2027 ग्रॅम सोन्याचे दागिने सापडले.

यापैकी इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांनी 1127 ग्रॅम सोन्याच्या दागिन्यांना मान्यता दिली नाही. यांनी 1127 ग्रॅम सोनं unexplained म्हणून घोषित केले. इन्दोर ट्रिब्यनल यांनी मान्य केले की अर्चना अग्रवाल हे करदाते उच्चभू परिवारातून आहे.

अशा परिवारात सोन्याचे भरपूर दागिने जमा असणे ही सामान्य बाब आहे. स्त्रीधन म्हणून मान्यता देण्यास हरकत नाही असे सांगून 4-5-1954 च्या सी.बी.डी.टी. च्या परिपत्रकाप्रमाणे श्रीमती अर्चना यांना 500 ग्रॅम, त्यांचे पती यांना 100 ग्रॅम, दोन पुत्र यांना प्रत्येकी 100 ग्रॅम अशी मान्यता स्त्रीधन म्हणून देण्यात आली.

परंतु, बाकीच्या सोन्याच्या दागिन्यांवर टॅक्स लावण्यात आले. ट्रिब्यनलचे म्हणणे पडले की स्त्रीधनसाठी ठोस पुरावे, आणि सविस्तर कागद पत्र नसल्यामुळे स्त्रीधनची मान्यता नाकारली.

यावरून असे समजण्यास हरकत नाही की सी.बी.डी.टी. च्या परिपत्रकापेक्षा अधिक दागिने असल्यास ते स्त्रीधन दान आहे असे सिद्ध करणारे कागदपत्र जपून ठेवणे आवश्यक आहे. उदा, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र इत्यादी.

पुढील आठवड्यात आपण बघणार आहोत की हिंदू कायद्या प्रमाणे स्त्रीधनमध्ये काय काय समविष्ट होते?

■ ■ ■

# शिक्षणाची ढासळती गुणवत्ता

शिक्षण म्हणजेच गुणवत्ता वृद्धी. शैक्षणिक गुणवत्तेची व्याख्या आणि मोजमाप करणे, हे तसे अवघड व गुंतागुंतीचे काम. जगात शिक्षणाच्या इतिहासात शिक्षण गुणवत्तापूर्ण असायाल हवे असा विचार सातत्याने मांडण्यात येतो. शिक्षणाच्या इतिहासाची पाने चाळली तर शिक्षण गुणवत्तापूर्ण होते असे फारसे दिसत नाही. खरं तर गुणवत्ता म्हणजे नेमके काय? हे व्याख्येत बांधण्याचा प्रयत्न आजवर अनेकांनी केला आहे. मात्र, त्या व्याख्येत अपेक्षांची भिन्नता दिसून येते. शिक्षणाच्या प्रक्रियेत आपण गुणवत्तेचा जो विचार करतो आहोत आणि त्यात गुणवत्तेची जी कल्पना आहे ती व्यक्ती सापेक्ष संकल्पना आहे.

-----------

वर्तमानातील अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न शिक्षणाकडून होण्याची गरज असते. मात्र, त्या अपेक्षा शिक्षणातून साध्य होतील असे घडत नाही. वर्तमानातील अपेक्षा शिक्षणाकडून पूर्ण झाल्या नाही तर शिक्षण गुणवत्तापूर्ण नाही असे मानले जाते. त्यामुळे शिक्षण गुणवत्तापूर्ण करण्यासाठीचे प्रयत्न व्यवस्थेत सातत्याने होत असतात. शिक्षणातून अपेक्षा असतात आणि त्या पूर्ण करण्यासाठी काळ लागत असतो. त्यामुळे वर्तमानातील अपेक्ष पूर्ण करण्यासाठी भविष्यात वाट चालावी लागते.

आज बऱ्याच शाळा ओसाड पडत आहे. कारण तिथे शिक्षकांचा तुटवडा पडत आहे. कुठे ७ वर्गासाठी १ किंवा २ तर कुठे ५ वर्गासाठी १ च शिक्षक आहे. त्यामुळे शिक्षणाची अपेक्षापूर्ती होत नाही. यामुळे शिक्षणाची गुणवत्ता ढासळत चालली आहे. केवळ हेच कारण नाही, तर बरेच शिक्षक आपल्या शिक्षकीपेशाला काळीमा फासणारे आहेत. बऱ्याच शिक्षकांच्या हालचालीवरून, व्यवहारावरून एकंदरीत त्यांच्या वर्तवणूकीवरून ते विद्यार्थ्यांचं काय भविष्य घडवतील हा प्रश्न सतत मनाला सतावतो. यातीलच एक कारण पुढे करून शिक्षक पण शिकविण्यास पात्र असावे म्हणून राज्य शासनाने शिक्षक पात्रता परीक्षा घेणे सुरु केले आहे. विद्यार्थ्यांना घडविणारे शिक्षकवृंद पण तावून सुलाखून निघणार असतील तर उत्तम. हा त्यामागचा हेतू शासनाने ठेवला.

उद्याची पिढी घडवणा-या राज्यातील प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षक पात्रतेसाठी महत्त्वाची असलेली महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीईटी) च्या २०२५ मध्ये झालेल्या अंतिम परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. मात्र, या निकालाने राज्यातील अनेकांच्या अपेक्षांवर पाणी फेरले गेले आहे. हा निकाल शिक्षण क्षेत्रास चांगलाच धक्का देणारा ठरला असून राज्यातील शिक्षक गुणवत्तेवर प्रश्न निर्माण झाले आहेत.

या परीक्षेत केवळ ११.२८ टक्के शिक्षक उमेदवार उत्तीर्ण झाले. ४.७५ लाख शिक्षकांपैकी ३ लाख ९६ हजार शिक्षक अनुत्तीर्ण झाले ही बाब धक्कादायक आहे. केवळ धक्कादायकच नसून भविष्यातील शिक्षक व शिक्षण यांच्या दारुण परिस्थिवर प्रकाश टाकणारी आहे. सर्वाधिक कन्नड माध्यमाचे १५ टक्के तर मराठीचे १२.२८ टक्के, हिंदीचे १२.१९ टक्के तर तेलुगू माध्यमाचे याच सरासरीच्या आसपास उमेदवार उत्तीर्ण झाले. यात उर्दू, इंग्रजी आणि गुजराती माध्यमाचा निकाल सर्वात कमी ३.४४ टक्के लागला.

एकदा डीएड झालो आणि शिक्षक म्हणून चिकटलो की मोकळे ही बऱ्याच शिक्षकांची मानसिकता...आता वर्षानुवर्ष मी कुठल्याही परीक्षेला कशाला सामोरे जायचे? या भावनेतून टीईटी परीक्षेला काही शिक्षक संघटनांचा विरोध राहिला. अन्य क्षेत्रात स्वतःला अपडेट ठेवण्याकरिता धडपड सुरु असताना शिक्षकांनी अशी भूमिका घेणे हे योग्य नव्हेच. एआयमुळे वेगवेगळ्या क्षेत्रात झपाट्याने बदल होत आहेत. भविष्यात शिक्षण क्षेत्रही त्यापासून वेगळे नसेल. त्यामुळे आपल्या बुद्धीला तावूनसुलाखून पाहण्यात काहीच गैर नाही.



शब्दस्पर्शी-सुनील शिरपुरे
कमळवेल्ली,यवतमाळ
७०५७१८५४७९

मात्र, ज्यांनी शिकविण्याकरिता अजून खडू हातात धरलाही नाही, अशा शिक्षकांची या परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्याची मोठी संख्या आहे. आता जे उत्तीर्ण झाले ते सध्या शिक्षक असून ही परीक्षा दिल्याखेरीज आपली नोकरी कायम होणार नाही, अशी टांगती तलवार मानगुटीवर कायम असल्याने ज्यांनी परीक्षा दिली तेच यात उत्तीर्ण झाल्याने निकाल ११ टक्क्यांच्या आसपास लागला.

यावरून भविष्यातील शिक्षक व शिक्षण यांची अवस्था कशी भीतीदायक आहे, याचाच साक्षात्कार होतो. शिक्षक होण्याकरिता धडपडणाऱ्यांना अपयश येण्याचे मुख्य कारण हे सध्याच्या कंत्राटी शिक्षणात आहे. अत्यल्प वेतन देऊन अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षकांची पिळवणूक होते. एका रकमेवर स्वाक्षरी घ्यायची आणि अत्यल्प रक्कम हातावर टिकवायची, असे प्रकार आहेत. त्यामुळे अन्य कुठल्याच क्षेत्रात पाय रोवता आला नाही तोच शेवटचा पर्याय म्हणून या क्षेत्राकडे वळतो, असे म्हटले तर ते अयोग्य ठरणार नाही.

ज्यांना निवृत्तीला केवळ ६ महिने बाकी आहेत. अशा शिक्षकांनाही ही परीक्षा सक्तीची केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे ही परीक्षा अनिवार्य केली गेली. एकीकडे अशैक्षणिक कामाच्या बोजाने शिक्षक त्रस्त आहेत. शालेय पोषण आहारातील तांदुळाचा हिशेब ठेवण्यापासून तंबाखुमुक्त अभियानाची माहिती सरकारला भरून देण्यापर्यंत जवळपास शंभरेक कामे शिक्षकांना लावली आहेत. सरकारचे अशैक्षणिक कामे शिक्षकांवर लादण्याचे धोरण असमर्थनीय आहे. यामुळे शिक्षकांचे मूळ कामाकडे दुर्लक्ष होत आहे. या कामांच्या बोजाने शिक्षक अक्षरशः वाकले आहेत. शिवाय शिक्षकांकरिता वेगवेगळे प्रशिक्षण आयोजित केले जाते. त्यामुळेही या परीक्षेला विरोध होत आहे. टीईटी परीक्षेची काठिण्य पातळी जास्त आहे. दिलेल्या ४ पर्यायातून १ पर्याय निवडायचा असतो. शिवाय नकारात्मक गुण पद्धत आहे.

त्यामुळे अनेकदा शिक्षकांचा गोंधळ उडतो. परिणामी त्यांच्या पदरात भोपळा पडतो. जसे टीईटी परीक्षेला विरोध करणाऱ्यांचे समर्थन करता येत नाही तसेच टीईटीची सरसकट सक्ती ही देखील योग्य म्हणता येत नाही. विद्यार्थ्यांकडून गुणवत्तेची व पैकीच्या पैकी गुणांची अपेक्षा करणा-या शिक्षकांनी टीईटी परीक्षेत अधिक चमकदार कामगिरी करून आपली गुणवत्ता सिद्ध करावी ही अपेक्षा बाळगणे अचूक आहे.

# महाभयंकर वाहतूक कोंडी आणि ढीम्म प्रशासन

**वाचक लिहितात**

विकासाच्या नावाखाली मोठमोठे हाय-वे बांधणाऱ्या सरकारला आपात्कालीन वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यात मात्र 100% अपयश आले. मुंबई- पुणे द्रुतगती महामार्गावर मुंबईपासून काही किलोमीटर अंतरावर आडोशी बोगद्याजवळ ज्वलनशील प्रोपोलीन वायूचा टँकर उलटल्याने एका बाजूचा मार्ग अनिश्चित काळासाठी बंद करण्यात आला. त्यामुळे जवळपास 32 तास हजारो लोक असहाय्य स्थितीत अडकून पडले.

ही अनिश्चितता इतकी भयंकर होती की जनतेच्या संयमाची कोंडी तर या प्रसंगाने केलीच, पण प्रशासनातील विविध विभागांच्या समन्वयातील अभाव प्रकर्षाने यातून दिसून आला. वायुगळती रोखण्याचे शतीर्चे प्रयत्न होत होते. मात्र त्याचा अंदाज घेऊन पुढील वाहनांना त्या मार्गावर येण्यापासून रोखता आले असते तर ही वाहतूक कोंडीची संख्या कमी झाली असती.

यामुळे प्रवाशांना प्रचंड त्रास सोसावा लागला. प्रसाधनगृहांच्या अभावी महिलांची कुचंबना झाली. अन्न - पाण्याशिवाय लहान मुले, वृद्ध व्यक्ती यांचे अतोनात हाल झाले, काहींची विमाने चुकली, काहींचे लग्नाचे संपूर्ण वऱ्हाडच यात अडकून पडले.

चार पाच तासांच्या वाहतूक कोंडीत मध्ये किती हाल होतात ते आपण अनुभवतो .तर या 32 तासांच्या वाहतूक कोंडीत प्रवाशांची अवस्था किती भयानक झाली असेल, याची कल्पना करवत नाही. ज्या क्षणी हा टँकर उलटला त्याच क्षणी पुढची परिस्थिती कशी निर्माण होऊ शकते याचा अंदाज घेऊन टीव्ही, रेडिओ, मोबाईल वरून नागरिकांना याविषयी सूचना दिल्या असत्या आणि या मार्गाने न येण्याचे आवाहन केले असते तर ही परिस्थिती भयंकर प्रमाणात उद्भवली नसती.

टँकरची दुरुस्ती व्हायला वेळ लागणार याचा अंदाज घेऊन वाहतूक काही किलोमीटर आधीच थांबवून ती मागे फिरवण्याच्या उपाययोजना करता आल्या असत्या. पण नाही! ढिम्म सरकार, ढिम्म प्रशासन ! जनतेच्या त्रासाशी त्यांना काही देणेघेणे नाही.

आजूबाजूच्या गावकऱ्यांनी खाण्यापिण्याचे सहाय्य केले. अशावेळी आपात्कालीन उपायोजना करणे गरजेचे होते. पण काहीच केले गेले नाही. यातून हाच प्रश्न उपस्थित होतो, की घटनास्थळी असलेल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना आपात्कालीन परिस्थिती उद्भवल्यास काय करायचे याचे प्रशिक्षण होते की नाही? खरंतर वाढते रस्ते अपघात आणि जगभरातील युद्धजन्य स्थिती यामुळे प्रत्येक नागरिकाला आपात्कालीन प्रशिक्षण आणि प्रथमोपचार शिकणे गरजेचे आहे.

निवडणुकीत मते मिळवण्यासाठी हजारो रुपये वाटणारे राजकारणी या वेळेला मात्र काही उपयोगी पडले नाही. अशा परिस्थितीत देवाचा धावा करण्याशिवाय दुसरा पर्याय उरला नाही हेच खरे.

■ सौ. माधवी पत्की
नागपूर.

# गण गण गणात बोते...

अनंत कोटी ब्रह्मांडनायक, महाराजा धिराज, योगीराज, परब्रह्म सच्चिदानंद भक्तप्रतिपालक, शेगाव निवासी समर्थ सदगुरु श्री गजानन महाराज की जय! सदगुरु श्री गजानन महाराज जेव्हा पावन तीर्थक्षेत्री शेगाव नगरीत प्रगट झाले, त्या क्षणापासून ही भूमी कृतार्थ झाली. महाराजांचे अवतरण हे केवळ एका संताचे प्रगट होणे नसून, करुणा, त्याग, तपस्या आणि भक्तवत्सलतेचा साक्षात अविष्कार होता. महाराजांचे संपूर्ण जीवन मानवजातीसाठी एक दिव्य व कालातीत संदेश ठरले आहे.

आज आपण शेगाव येथे महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतो. त्यानंतर महाराजांच्या कृपाशीवार्दाने पावन झालेल्या परिसरात नजर टाकली असता, तेजस्वी व भव्य स्वरूपातील महाराजांचे फोटोदर्शन होते. मात्र महाराजांच्या बालरूपातील छायाचित्रात दिसणारे उष्टे अन्न ग्रहण करणारे, अलिप्त व अवलिया स्वरूप आपल्याला वैराग्य, अहंकारशून्यता, समत्व आणि पूर्ण समर्पणाची शिकवण देऊन जाते. ऐहिक सुख-दुःखांपासून अलिप्त राहून परमेश्वरभक्तीत तल्लीन राहण्याचा आदर्श महाराजांनी आपल्या आचरणातून घालून दिला.

ज्या शेगाव नगरीत महाराजांनी आपल्या पावन चरणांचा पदस्पर्श केला, त्या भूमीला त्यांच्या कृपाशीवार्दाने अलौकिक महत्त्व प्राप्त झाले. आज त्या तीर्थस्थळी महाराजांच्या कृपेने लाखो भाविक भक्तगण पोटभर प्रसाद ग्रहण करून धन्यता मानतात. येथे कोणीही उपाशी राहत नाही, कोणीही निराश परत जात नाही... हीच महाराजांची अपार करुणा व दिव्य लीला आहे. दोन्ही हात जोडून जय गजानन करतो



भाविकांसाठी नियोजन करणारे सन्माननीय ट्रस्टी व सेवेकरी यांची सेवा खरोखरच शब्दातीत आहे.

संत सदगुरु श्री गजानन महाराजांच्या कृपाशीर्वादाने शेगाव नगरीचा सर्वांगीण विकास झाला आहे. येथे सेवा, श्रद्धा आणि परिश्रम यांचा सुंदर संगम पाहायला मिळतो. छोटे-मोठे व्यावसायिक, सेवेकरी, साधक व भक्त प्रामाणिकपणे आपला उदरनिर्वाह करीत असून, भाविक भक्तगण हा आदर्श स्वीकारून धन्यता मानतात. यामागे महाराजांचीच कृपा असल्याची दृढ भावना प्रत्येकाच्या मनात आहे. आज शेगाव हे केवळ तीर्थस्थान न राहता श्रद्धा, सेवा, समाधान आणि समत्व यांचे पवित्र केंद्र बनले आहे.

महाराजांचे कार्य केवळ चमत्कारांपुरते मर्यादित नव्हते. त्यांनी आपल्या आचरणातून मानवतेला जो संदेश दिला, तो आजही तितकाच मार्गदर्शक आहे... सदाचार ठेवा, अहंकार टाळा, निःस्वार्थ सेवा करा आणि नामस्मरणात जीवन व्यतीत करा.

या पावन प्रगट दिनानिमित्त आपण सर्वांनी संत सदगुरु श्री गजानन महाराजांच्या चरणी नतमस्तक होऊन त्यांच्या शिकवणीनुसार आदर्श जीवन जगण्याचा संकल्प करूया. महाराजांच्या कृपाशीवार्दाने सर्वांच्या जीवनात आनंद, समाधान, आरोग्य आणि भक्तिभाव नांदो, हीच प्रार्थना महाराजांच्या चरणी करीत आहे.

-------------

■ उमेश महादेवराव ढोणे
सह-आयोजक
महर्षी वाल्मिकी जयंती महोत्सव समिती
९०४९०६७३३१

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



**। गण गण गणात बोते ।**

पेटविता आगटी
उठल्या मधमाशा
जिवाच्या आकांताने
लोक पळाले चहू दिशा..

मका सेवना निमित्ते
बघा सुखद
प्रसंगी सर्व नाती
कठीण समयी
कोण येती?..

मृगजलासम
संसार आहे
सत्य जाणूनी
सावध व्हावे
प्रभूशी आपले जोडा नाते
नौका लावी
तोच पैल तिराते..!

# ॲडव्हान्टेज विदर्भ २०२६ मध्ये अदाणी समूहातील जित अदाणी यांचे मनोगत



**नागपूर, ७ फेब्रुवारी :** ॲडव्हान्टेज विदर्भ २०२६ मध्ये या मंचावर आपल्यासोबत उपस्थित राहणे माझ्यासाठी सन्मानाची गोष्ट आहे. हा मंच केवळ विदर्भाचा किंवा महाराष्ट्राचा नव्हे, तर संपूर्ण भारताच्या भविष्याला दिशा देणाऱ्या दूरदृष्टी असलेल्या व्यक्तींना एकत्र आणतो.

भविष्यासंदर्भात बोलण्यापूर्वी, विदर्भाने नेहमी कशाचे प्रतिनिधित्व केले आहे, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. प्राचीन संस्कृतमध्ये रुजलेले 'विदर्भ' हे नावच पवित्रता, सुसंस्कृतपणा आणि पवित्र सामर्थ्याचे प्रतीक आहे. वि म्हणजे अद्वितीय किंवा वेगळेपण, आणि दर्भ म्हणजे पवित्र, टिकाऊ गवत. आपल्या प्राचीन ग्रंथांमध्ये विदर्भ हा उत्कृष्ट कारागिरी, समृद्ध संस्कृती, ज्ञान आणि धैर्य यासाठी ओळखला जातो. ही रुक्मिणीची भूमी आहे, प्राचीन विदर्भ राजांचे राज्य आहे, आणि सभ्यता, ज्ञान व संस्कृती यांचा संगम म्हणून ओळखला जाणारा हा एक प्रदेश आहे.

तुकडोजी महाराजांच्या शिकवणुकींपासून ते आधुनिक महाराष्ट्र घडवणाऱ्या सुधारणा चळवळींपर्यंत, विदर्भाने भारताच्या नैतिक आणि बौद्धिक पायाभरणीला सतत बळ दिले आहे. प्रशासकीय दृष्ट्याही विदर्भाचे महत्त्व मोठे आहे. एकेकाळी मध्य प्रांत आणि बेरारची राजधानी असलेले आणि आज महाराष्ट्राची हिवाळी राजधानी असलेले नागपूर हे शहर ऐतिहासिक प्रशासकीय केंद्रातून उद्योग, नवकल्पना आणि कनेक्टिव्हिटीचे एक उदयोन्मुख केंद्र बनले आहे. भारताच्या भौगोलिक मध्यभागी असलेले, सुयोग्य शहरी नियोजन, शिक्षणसंस्था आणि वैज्ञानिक दृष्टिकोनासाठी ओळखले जाणारे नागपूर आज लॉजिस्टिक्स, विमानवाहतूक आणि तंत्रज्ञानात आघाडीवर आहे. आधुनिकतेकडे वाटचाल करतानाही, या शहराने आपली ओळख कायम ठेवली आहे.

माझा ठाम विश्वास आहे की विदर्भ ज्याच्या नावाचा अर्थ सामर्थ्य आणि वैशिष्ट्यांची भूमी असा आहे. आपल्या समृद्ध वारशाला नव्या आर्थिक आणि सांस्कृतिक शक्तीत रूपांतरित करण्यासाठी सज्ज आहे. योग्य पायाभूत सुविधा, सक्षम नेतृत्व आणि मजबूत भागीदारी मिळाल्यास हा प्रदेश पुन्हा एकदा शिक्षण, व्यापार आणि राष्ट्रीय विकासाचे केंद्र म्हणून पुन्हा उदयास येऊ शकतो.

भविष्याकडे पाहताना, मी विदर्भाला केवळ महाराष्ट्राचा एक भाग म्हणून पाहत नाही, तर असा प्रदेश म्हणून पाहतो जो पुढील अनेक दशकांमध्ये भारताच्या विकासाला आकार देईल. आपल्या नावाच्या अर्थाप्रमाणे - सशक्त, अद्वितीय आणि पवित्र विदर्भ नेतृत्व करण्यास सज्ज आहे. देशाच्या नेतृत्वाने पाया तयार केला आहे, विदर्भातील लोक ऊर्जा, सर्जनशीलता आणि महत्त्वाकांक्षा घेऊन आले आहेत, आणि अदाणी समूह दीर्घकालीन भागीदार म्हणून तयार आहे.

एकत्र येऊन, आपण संधी, सहनशीलता आणि समृद्धी यांचे युग निर्माण करू. असे युग जे संपूर्ण देशाला प्रेरणा देईल.

हे आमचे वचन आहे. हेच आमचे ध्येय आहे. आणि हाच तो विदर्भ आहे, जो आपण सर्व मिळून घडवू.

# सीग्रामचा रॉयल स्टॅग बूमबॉक्स 'जनरेशन लार्ज' च्या मूळ आवाजासह परत आले आहे, पूर्वीपेक्षाही अधिक भव्य

**नागपूर, ७ फेब्रुवारी :** सीग्रामचा रॉयल स्टॅग बूमबॉक्स हा बॉलीवूडच्या अजरामर सुरांना आणि हिप-हॉपच्या ऊर्जावान तालांना एकत्र आणणारा, संगीतप्रेमींमध्ये खास ओळख असलेला अनुभवाधारित संगीत महोत्सव पुन्हा एकदा आपल्या बहुप्रतिक्षित सीझन फोरसह परतला आहे. मागील सर्व सीझनना मिळालेल्या प्रचंड यशावर उभारलेला हा नवा सीजन यंदा अधिक भव्य आणि महत्त्वाकांक्षी ठरणार असून, भारतातील तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील नामवंत कलाकारांची दमदार फळी यात सहभागी होणार आहे. तरुणाईच्या उत्साहाने भरलेल्या व्हिझाग, कोलकाता, मुंबई आणि मोहाली या चार प्रमुख शहरांमध्ये होणारा हा मल्टी-सिटी टूर संगीतप्रेमींना एक अविस्मरणीय अनुभव देणार आहे.




रॉयल स्टॅग बूमबॉक्स हा आजच्या तरुण पिढीच्या विविध आवडी-निवडींना एकत्र आणणारा, आगळा-वेगळा अनुभव देणारा उपक्रम म्हणून ओळखला जातो. संगीत, फॅशन, खाद्यसंस्कृती आणि गेमिंग अशा तरुणाईच्या आवडत्या क्षेत्रांना जोडणाऱ्या उपसंस्कृतिक घटकांचा सुरेख संगम साधत, हा मंच प्रेक्षकांना वेगळ्या आणि प्रभावी अभिव्यक्तीचा अनुभव देतो.

सीझन ४ ची सुरुवात २१ फेब्रुवारी २०२६ रोजी कोलकात्यातून होणार असून, त्यानंतर हा संगीतसोहळा ७ मार्चला विशाखापट्टणम, २१ मार्चला मुंबई आणि २८ मार्चला मोहाली येथे रंगणार आहे. स्थापनेपासूनच या महोत्सवाने बॉलीवूडमधील दिग्गज आवाज आणि ऊर्जावान हिप-हॉप कलाकारांच्या थरारक जुगलबंदीमधून भारताच्या लाईव्ह म्युझिक विश्वाला नवे रूप दिले आहे. यंदाच्या सीझनमध्ये जागतिक ख्यातीचा डीजे ॲलान वॉकर, रॅप सुपरस्टार बादशाह, चार्टबस्टर कलाकार अरमान मलिक आणि डिव्हाईन, तसेच सुमधुर गायिका नीति मोहन, निकिता गांधी, रश्मीत कौर, श्रीराम चंद्रा आणि दिग्गज बँड फॉसिल यांचा दमदार आणि तगडा लाइन-अप प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या संगीत उत्सवाची रंगत आणखी वाढवण्यासाठी हिप-हॉपमधील दिग्गज रफ्तार आणि डिनो जेम्स, तसेच लोकप्रिय डीजे साहिल गुलाटी ही मंचावर धमाल सादरीकरण घेऊन येणार आहेत, चार्टबस्टर गाण्यांची मेजवानी आणि थरारक परफॉर्मन्सचा अविस्मरणीय प्रवास प्रेक्षकांना अनुभवता येणार आहे. इतक्यावरच थांबत नाहीगेमिंग विश्वातील प्रसिद्ध स्टार पायल धरे हिच्यासोबत होणारा थरारक गेमिंग फेस-ऑफही चाहत्यांना पाहायला मिळणार असून, त्यामुळे हा सीझन खऱ्या अर्थाने एक संपूर्ण, सहभागात्मक आणि भव्य सांस्कृतिक महोत्सव ठरणार आहे.

रॉयल स्टॅग बूमबॉक्स हा भव्य ध्वनी-प्रकाश मांडणी, सहभागी चाहत्यांसाठी खास झोन्स आणि रंगतदार सांस्कृतिक सादरीकरणांचा संगम साधणारे, बहुअंगी आणि अनुभवसमृद्ध कार्यक्रम घडवण्यासाठी प्रसिद्ध आहे, प्रत्येक आयोजन करणाऱ्या शहराची खासियत आणि ऊर्जा टिपत, हा मंच प्रेक्षकांना एक अविस्मरणीय अनुभव देतो.

# जावा येझदी मोटरसायकल्सने नागपूरमध्ये नवीन डीलरशिपसह महाराष्ट्रातील उपस्थिती अधिक मजबूत केली

**नागपूर, ७ फेब्रुवारी :** भारतातील दुसऱ्या क्रमांकाच्या दुचाकी बाजारपेठ असलेल्या महाराष्ट्रात जावा येझदी मोटरसायकल्सने आपली उपस्थिती अधिक बळकट करत नागपूरमध्ये नवीन डीलरशिप सुरू केली आहे. प्रीमियम मोटरसायकलिंगची मागणी वेगाने वाढत असलेल्या राज्यातील प्रमुख उदयोन्मुख बाजारांपैकी नागपूर हे एक महत्त्वाचे शहर आहे. उन्नती ऑटो शहरातील रायडर्सना सातत्यपूर्ण आणि विश्वासार्ह आफ्टर-सेल्स सपोर्ट देण्याच्या कंपनीच्या दृढ वचनपूर्तीला पाठबळ देणार आहे.

आयटी हब्स आणि विशेष आर्थिक क्षेत्रांमुळे वाढत असलेल्या शहरी लोकसंख्येमुळे नागपूर हे एक महत्त्वाचे आकांक्षी बाजार म्हणून उदयास येत आहे. येथे तरुण व्यावसायिक प्रीमियम मिड-साईज मोटरसायकल्सकडे आकर्षित होत असून, या मोटरसायकल्स शहरातील वाहतूक सहज हाताळण्यासोबतच नवीन नागपूरमुंबई समृद्धी एक्सप्रेसवे सारख्या हायवेवर टूरिंगचा उत्तम अनुभव देतात.

जावा येझदी मोटरसायकल्सचे सहसंस्थापक अनुपम थरेजा म्हणाले, मुंबई आणि पुण्यात प्रति किलोमीटर दुचाकींची घनता इतर भारतीय शहरांच्या तुलनेत जास्त असल्याबद्दल आपण ऐकतो. नागपूरलाही दुचाकींची विशेष आवड आहे आणि येथे नोंदणीत दुचाकींची संख्या चारचाकीपेक्षा जास्त आहे. शहराची वाढती लोकसंख्या आणि नागपूरमधून टूरिंग व ॲडव्हेंचरचा वाढता कल पाहता, येथील तरुण आणि महत्त्वाकांक्षी रायडर्स आता खऱ्या परफॉर्मन्स क्लासिक मोटरसायकलिंगच्या जगात प्रवेश करण्यास तयार आहेत, असा आमचा विश्वास आहे. आमचा नवीन अधिकृत भागीदार नागपूरमधील उत्साही रायडर्सना सर्वोत्तम मिड-साईजइंजिन्स, रायडर-फर्स्ट फीचर्स, आकर्षक डिझाइन आणि भारतातील समृद्ध रायडर परंपरेत रुजलेल्या ब्रँड्ससह स्वागत करण्यात मदत करेल.

लाकडगंज, नागपूर येथे स्थित ही डीलरशिप संपूर्ण ३एस (सेल्स, सर्व्हिस, स्पेअर्स) सुविधेसह सुसज्ज असून ग्राहकांना एक परिपूर्ण मालकी अनुभव देण्यासाठी तयार करण्यात आली आहे. येथे जावा आणि येझदी मोटरसायकल्सची संपूर्ण श्रेणी, अस्सल ॲक्सेसरीज आणि कस्टमायझेशन पर्याय उपलब्ध असतील.

उन्नती ऑटो जावा येझदी मोटरसायकल्सच्या देशव्यापी मजबूत नेटवर्कचा भाग बनली असून, हे नेटवर्क वारसा, परफॉर्मन्स आणि विश्वास यांचा संगम साधणारा सातत्यपूर्ण आणि उच्च दर्जाचा अनुभव देण्यासाठी उभारण्यात आले आहे. सर्व ३एस सुविधांप्रमाणेच, या डीलरशिपला प्रशिक्षित तंत्रज्ञ, अत्याधुनिक साधने आणि कंपनीचा पहिल्याच श्रेणीतील कस्टमर ॲश्युरन्स प्रोग्रामचा पाठिंबा आहे.

# व्हॅलेंटाईन डे निमित्त सोनी सब कलाकारांनी व्यक्त केलेल्या प्रेमाच्या भावना



**मुंबई, ७ फेब्रुवारी :** व्हॅलेंटाईन डे हा प्रामुख्याने रोमँसचा उत्सव मानला जातो, पण प्रेम अनेक साध्या आणि टिकाऊ रूपांतही अस्तित्वात असते. ते दैनंदिन क्षणांत, अर्थपूर्ण नात्यांत आणि शांत भावनांत सापडते ज्या जीवनात आधार, संतुलन आणि ऊब आणतात. प्रेम बाहेरून व्यक्त होण्याआधीच ते लहानशा गोष्टींमध्ये जाणवते आणि मनाशी घट्ट जोडलेले राहते. या व्हॅलेंटाईन डे निमित्त सोनी सब चे कलाकार सुम्बुल तौकीर खान, नितीन बाबू, अक्षया हिंदळकर, ऋषी सक्सेना आणि दीक्षा जोशी यांनी प्रेमाविषयी आपले विचार मांडले, जे आपल्याला आठवण करून देतात की प्रेम हे साध्या अनुभवांत आणि क्षणांतच सर्वाधिक अर्थपूर्ण असते.

सुम्बुल तौकीर खान, इत्ती सी खुशी मध्ये अन्विता ही भूमिका साकारत असून, त्यांनी सांगितले माझ्यासाठी व्हॅलेंटाईन डे हा मोठ्या दिखाव्याचा किंवा फक्त रोमँटिक प्रेमाचा दिवस नाही, तर तो भावनिक प्रामाणिकपणाचा आणि खऱ्या अर्थाने समजून घेण्याचा दिवस आहे. प्रेम त्या लोकांत सापडते जे तुमच्या कठीण काळात तुमच्या सोबत उभे राहतात, तुमच्या छोट्या यशांचा आनंद साजरा करतात आणि तुम्हाला जसे आहात तसे स्वीकारतात. मी शिकलो आहे की प्रेमाची सुरुवात स्वतःशी दयाळू राहण्यात आणि आपल्या प्रवासाला महत्त्व देण्यात होते. जेव्हा तुम्ही असे करता, तेव्हा प्रत्येक नातं कुटुंब, मित्र किंवा जोडीदारअधिक अर्थपूर्ण होते. या व्हॅलेंटाईन डे ला मी माझ्या सभोवतालच्या सर्व प्रकारच्या प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा निर्णय घेतला आहे.

नितीन बाबू, पुष्पा इम्पॉसिबल मध्ये चिराग पटेलची भूमिका साकारत असून, त्यांनी सांगितले प्रेम नेहमीच नाट्यमय किंवा परिपूर्ण असण्याची गरज नाही. कधी कधी ते फक्त कोणासाठी उपस्थित राहण्यात, निःपक्षपातीपणे ऐकण्यात आणि चढ-उतारांत एकमेकांना साथ देण्यात असते. माझ्या मते व्हॅलेंटाईन डे हा आपल्या जीवनाला अधिक चांगले बनवणाऱ्या लोकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची सुंदर आठवण आहे. मग ते कुटुंब असो, मित्र असो किंवा कुणी खास व्यक्ती प्रेम म्हणजे सातत्य, विश्वास आणि खरी काळजी. मला आनंद आहे की माझ्या सभोवती असे लोक आहेत जे मला जमिनीवर ठेवतात आणि मला खऱ्या प्रेमाचे स्वरूप दाखवतात.

ऋषी सक्सेना, इत्ती सी खुशी मध्ये संजयची भूमिका साकारत असून, त्यांनी सांगितले माझ्या मते प्रेम ही सर्वात शक्तिशाली भावना आहे ती तुम्हाला संयम, सहानुभूती आणि संतुलन शिकवते. व्हॅलेंटाईन डे आपल्याला त्या भावनेचा उत्सव साजरा करण्याची संधी देतो, पण मला वाटते प्रेम दररोज व्यक्त केले पाहिजे, फक्त एका प्रसंगी नाही. खरं प्रेम म्हणजे एकत्र वाढणे, एकमेकांच्या स्वप्नांना साथ देणे आणि सामायिक शांततेत आराम शोधणे. तसेच स्वतःवर इतके प्रेम करणे की तुम्हाला तुमची किंमत कळावी. हेच मी खरोखर मानतो आणि जगण्याचा प्रयत्न करतो.

अक्षया हिंदळकर, पुष्पा इम्पॉसिबल मध्ये राशी पटेलची भूमिका साकारत असून, त्यांनी सांगितले आपण अनेकदा प्रेमाला फक्त नात्यांपुरते मर्यादित करतो, पण प्रेम त्यापेक्षा खूप मोठे आहे. ते सहवास, परस्पर आदर आणि भावनिक प्रामाणिकपणाबद्दल आहे. माझ्यासाठी व्हॅलेंटाईन डे म्हणजे जीवनाला अर्थपूर्ण बनवणाऱ्या सर्व लोकांचा उत्सव मित्र जे कुटुंबासारखे वाटतात, कुटुंब जे तुमची सर्वात मोठी ताकद असते आणि क्षण जे कायम स्मरणात राहतात. प्रेमाला लेबलची गरज नाही; त्याला फक्त प्रामाणिकपणाची गरज आहे.

दीक्षा जोशी, पुष्पा इम्पॉसिबल मध्ये दीप्तीची भूमिका साकारत असून, त्यांनी सांगितले तुमच्या सभोवतीचे लोक व्हॅलेंटाईन डे साजरा करताना, छोट्या प्रयत्नांनी आणि साध्या गोष्टींनी एकमेकांच्या चेहऱ्यावर हास्य आणताना पाहणे खरोखरच हृदयस्पर्शी असते. असे क्षण आपल्याला आठवण करून देतात की प्रेमाला नेहमीच मोठेपणा किंवा नाट्यमयता लागते असे नाहीते अनेकदा छोट्या कृतींमध्ये सापडते. जेव्हा सर्व काही परिपूर्ण दिसते, तेव्हा प्रेम व्यक्त करणे सोपे असते, पण खरे प्रेम कठीण काळातच परीक्षेला उतरते. माझ्यासाठी प्रेम म्हणजे गोष्टी परिपूर्ण नसताना एकमेकांच्या सोबत उभे राहणे, सोयीपेक्षा करुणेला निवडणे आणि आव्हानांतून एकत्र वाढणे. असे प्रेमच टिकते आणि खऱ्या अर्थाने अर्थपूर्ण वाटते.

# डायसन एअररॅप, मार्शल स्पीकर्स, आयफोन १७: क्रोमाच्या व्हॅलेंटाईन्स डे सेलमध्ये सर्व काही आकर्षक सवलतींमध्ये उपलब्ध आहे!

**नागपूर, ७ फेब्रुवारी :** भारतातील आघाडीचे इलेक्ट्रॉनिक्स रिटेलर आणि टाटा ग्रुपचे सदस्य क्रोमा, या व्हॅलेंटाईन्स डेला तुमच्यासाठी घेऊन आले आहेत अल्टिमेट गिफ्टिंग गाईड, ज्यामध्ये ६९९ पासून सुरू होणारे भरपूर पर्याय! प्रीमियम डिव्हाइसेसपासून ते दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंपर्यंत, विशेष किमती, श्रेणी सवलती आणि स्मार्टफोन, टॅब्लेट, वेअरेबल्स, ऑडिओ, वैयक्तिक काळजी आणि बरेच काही वर क्युरेटेड बंडल डील, यामुळे तुमच्या प्रिय व्यक्तीसाठी परिपूर्ण भेटवस्तू शोधणे सोपे होईल.

६ ते १५ फेब्रुवारी २०२६ दरम्यान सर्व क्रोमा स्टोअर्सवर व्हॅलेंटाईन्स डे ऑफर्सचा लाभ घेता येईल. ग्राहकांना कॅशबॅक आणि सुलभ ईएमआय पर्यायांसह अनेक आकर्षक फायदे मिळू शकतात, ज्यामुळे हा इलेक्ट्रॉनिक्स सेल आणखी रोमांचक होईल. सर्व किंमती आणि ऑफर ब्रँड, मॉडेल, स्टोअर, दिवस, शहर आणि उपलब्धतेनुसार बदलू शकतात आणि संबंधित बँक किंवा वित्त भागीदाराच्या अटी आणि शर्तींच्या अधीन आहेत. याव्यतिरिक्त, ग्राहक एचडीएफसी टाटा नेउ क्रेडिट कार्ड वापरून निवडक उत्पादनांवर १०% पर्यंत सूट मिळवू शकतील.

खास व्हॅलेंटाईन्स डेसाठी म्हणून, क्रोमाने 'हिरो ऑफर्स' सुरू केल्या आहेत, जिथे तुम्हाला सर्वाधिक विकल्या जाणाऱ्या स्मार्टफोन आणि ऑडिओ उत्पादनांवर उत्तम बचत मिळू शकते!

इन्फिनिटी रिटेल लिमिटेडच्या प्रवक्त्याने सांगितले की, व्हॅलेंटाईन्स डे हा नातेसंबंध साजरे करण्याचा आणि खास निवड करून आपुलकी दाखवण्याचा एक खास प्रसंग आहे. क्रोमामध्ये, आम्ही स्मार्टफोन, ऑडिओ, वेअरेबल्स आणि वैयक्तिक देखभाल यासारख्या श्रेणींमध्ये आकर्षक ऑफर्स तयार केल्या आहेत, जेणेकरून ग्राहक प्रत्येक बजेटमध्ये परिपूर्ण टेक गिफ्ट सहजपणे निवडू शकतील. परवडणाऱ्या किमती, व्हॅल्यू बंडल पॅक आणि स्टोअरमध्ये आमच्या तज्ज्ञांच्या पाठिंब्यासह, ग्राहकांना आत्मविश्वासाने भेटवस्तू देण्यात आणि त्यांचा व्हॅलेंटाईन्स डे संस्मरणीय बनविण्यात मदत करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे.

# रम्मू अग्रवाल यांच्या आर संदेश ग्रुपने रिअल इस्टेट क्षेत्रात एक महत्त्वाचा टप्पा गाठला आरटेक स्टुडिओजसोबत एक मोठा चित्रपट प्रोजेक्ट सुरू केला



**नागपूर, ७ फेब्रुवारी :** मध्य भारतातील अग्रगण्य रिअल इस्टेट आणि मीडिया ग्रुपपैकी एक असलेल्या, दूरदर्शी उद्योजक रामदेव (रम्मू) अग्रवाल आणि दिलीप अग्रवाल यांनी स्थापन केलेल्या, आर संदेश ग्रुपने, प्रीमियम गेटेड कम्युनिटी प्रोजेक्टच्या यशस्वी डिलीव्हरीसह या वर्षाची दमदार सुरुवात केली आहे. या यशावर आधारित, त्यांची मुलगी श्रद्धा अग्रवाल यांनी स्थापन केलेल्या 'आरटेक स्टुडिओज' या ग्रुपच्या सिस्टर कंपनीने, महत्त्वाकांक्षी नवीन चित्रपट प्रोजेक्टची (सध्याच्या अंदाजे शीर्षक डि५५) सुरूवात केली. या निमित्ताने चेन्नईमध्ये एक भव्य पूजा समारंभ आयोजित करण्यात आला होता.

या शुभ प्रसंगी, संस्थापक रम्मू अग्रवाल यांच्यासोबत मुख्य अभिनेते धनुष, श्रीलीला, साई पल्लवी आणि दिग्दर्शक राजकुमार पेरियासामीही उपस्थित होते, जे विविध उद्योगांतील कंपनीच्या वाढत्या विस्ताराचे प्रतीक आहे. या सोहळ्यानंतर अधिकृतपणे चित्रपटाचे शूटिंग सुरू झाले.

या चित्रपटाची निर्मिती आर टेक स्टुडिओज मीडियाप्रेन्योर अझमत जगमग आणि वंडरबार फिल्म्सचे श्रेयस श्रीनिवासन यांच्या सहकार्याने करत आहेत, तर विश्वनाथन रामास्वामी आणि संदेश अग्रवाल हे सह-निर्मातेआहेत. सध्या विकासाच्या टप्प्यात असलेल्या अनेक प्रकल्पांसह, आर टेक स्टुडिओज त्यांच्या क्रिएटिव्ह प्रोजेक्ट्सचा सतत विस्तार करत आहे, ज्यामुळे रिअल इस्टेट क्षेत्रातील आर संदेश ग्रुपचा मजबूत वारसा तसेच मनोरंजन क्षेत्रातील उपस्थिती आणखी मजबूत होत आहे.

## अविनेश रेखी यांनी निरण्य समाधिया (भगवान गणेश) यांच्यासोबत घालवलेला वेळ त्यांना स्वतःच्या मुलासोबतच्या क्षणांची आठवण करून देतो

**मुंबई, ७ फेब्रुवारी :** सोनी सबवरील पौराणिक गाथा गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय ही मालिका हृदयस्पर्शी कथाकथनातून दिव्य नात्यांचे सुंदर चित्रण करत आहे. भगवान शिवाची प्रभावी भूमिका साकारणाऱ्या अविनेश रेखींसाठी हा अनुभव अत्यंत वैयक्तिक ठरला आहे. निरण्य समाधिया (भगवान गणेश) आणि सुभान खान (भगवान कार्तिकेय) या बालकलाकारांसोबत स्क्रीन शेअर करताना अविनेश यांना अनेकदा स्वतःच्या मुलासोबत घालवलेल्या कोमल क्षणांची आठवण होते, ज्यामुळे सेटवरील प्रवास भावनिकदृष्ट्या समृद्ध झाला आहे.

सुभान आणि निरण्य यांची निरागसता, जिज्ञासा आणि सहज उमटणारी ऊब त्यांना पालकत्वातील छोट्या आनंदांची आठवण करून देते. शॉट्सच्या मधल्या वेळेत होणाऱ्या खेळकर गप्पा असोत किंवा दृश्यांदरम्यान दिलेले मार्गदर्शन आणि काळजी, अविनेश नकळतच संरक्षक आणि जिव्हाळ्याचा पिता म्हणून वागू लागतात. या क्षणांनी त्यांच्या भगवान शिवाच्या भूमिकेला अधिक प्रामाणिकपणा दिला असून, त्यांच्या दिव्य पुत्रांसोबतच्या ऑन-स्क्रीन नात्याला अधिक बळकटी मिळाली आहे.

या अनुभवाबद्दल बोलताना अविनेश रेखी म्हणाले, भगवान शिवाची भूमिका साकारणे हे आध्यात्मिकदृष्ट्या समृद्ध करणारे आहे, पण माझ्या मनाला खऱ्या अर्थाने स्पर्श करणारी गोष्ट म्हणजे सेटवर सुभान आणि निरण्य यांच्यासोबत घालवलेला वेळ. त्यांची निरागसता, प्रामाणिकपणा आणि जगाकडे पाहण्याची दृष्टी मला माझ्या मुलाची खूप आठवण करून देते. शॉट्सच्या मधल्या वेळेत आम्ही हसतो, बोलतो आणि साधे क्षण शेअर करतो, आणि त्या क्षणी मला असे वाटते की मी एखाद्या मालिकेत अभिनय करत नाही, तर फक्त एक पिता आहे. भगवान शिवाची भूमिका करताना हे पितृत्वाचे भाव अगदी सहजपणे उमटतात, कारण प्रेम, संयम आणि संरक्षकता ही माझ्या मुलासोबत रोज जगलेली भावना आहे.



## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस अतिशय शुभ आहे. एकूणच अंतर्गत समृद्धी आणि आत्मविश्वास वाढेल. आज तुम्ही लोकांशी अधिक चांगले नाते निर्माण कराल आणि स्वत:ला सकारात्मक आणि यशस्वी वाटेल.

**वृषभ :** मतभेदांमुळे मानसिक अस्वस्थता येऊ शकते. संयम ठेवा आणि संवादातून प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करा. हे अनुभव तुम्हाला महत्त्वाचे धडे देतील.

**मिथुन :** आज तुम्ही नवीन व्यवसायाची योजना देखील आखाल. महत्वाच्या निर्णयामध्ये तुम्हाला कुटुंबातील सदस्यांकडून पाठिंबा मिळेल. तुम्ही मित्रांसोबत प्रवासाची योजना आखू शकता.

**कर्क :** संवेदनशील विषयांवर बोलताना काळजी घ्या. शांत राहणे महत्त्वाचे आहे. भावना समजून घ्या आणि कुटुंबीय वा मित्रांशी मोकळेपणाने बोला. नकारात्मकता टाळा.

**सिंह :** आजचा दिवस थोडा कठीण असू शकतो. आध्यात्मिक आणि वैयक्तिक प्रगतीत काही अडथळे येऊ शकतात. आत्मपरीक्षणाचा हा काळ आहे. नात्यांमध्ये चढ-उतासंभवतात.

**कन्या :** प्रकृतीकडे लक्ष पुरवा. आज इतरांना मदत केल्याने फायदा होईल. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाजयांनी अधिक मेहनत घेणे आवश्यक आहे. कामात निष्काळजीपणा केल्यास नुकसान होईल.

**तूळ :** आजचा दिवस थोडा गोंधळात टाकणारा असू शकतो. परिस्थितीबाबत संभ्रम जाणवेल. नात्यांमध्ये चढ-उतारहोऊ शकतात. संयम ठेवा; परिस्थिती हळूहळू सुधारेल.

**वृश्चिक :** तुम्ही तुमच्या भावना स्पष्टपणे व्यक्त करू शकाल, ज्यामुळे नाती अधिक दृढ होतील. जोडीदारासोबत संवाद गोड आणि मनापासून होईल. जुन्या मित्रांशी भेट होऊ शकते. खुले मन ठेवा.

**धनु :** तुमचे मन ताजेतवाने होईल. कलांमध्ये रस असलेल्यांना हा दिवस अनुकूल वाटेल. तुमच्या कलेची प्रशंसा देखील होऊ शकते.

**मकर :** आजचा दिवस विशेष शुभ आहे. भावनिक नाती अधिक घट्ट होतील. आत्मविश्वास आणि संवेदनशीलता प्रियजनांशी जवळीक वाढवेल. तुमच्या जोडीदारासोबत बाहेरचा आनंद घ्या.

**कुंभ :** महत्वाच्या निर्णयाला घरच्यांकडून पाठिंबा मिळेल. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला असेल.

**मीन :** वैवाहिक जीवन आनंदी राहील. कामाच्या ठिकाणी येणारे अडथळे पार करण्याचा प्रयत्न करा. आज, तुमच्या आंतरिक शक्तीमुळे कामाच्या ठिकाणी तुमचा दिवस चांगला जाईल.

## शब्दकोडे क्रमांक २३४७



**आडवे शब्द :-**
१) पंढरपूरचे दैवत, पांडुरंग
३) ओझी वाहणारा
६) हद्दपार
८) खबदडी
१०) तात्काळ मिळणारी लोकप्रियता
११) समशेर
१३) बाजेला नवारीने विणणे
१५) चामखीळ
१८) पृथ्वी भोवतीचे हवेचे आवरण
२०) शरीराचा नाजुकपणा
२१) जंगलाला लागलेली आग
२३) मनाचा ओढा
२४) ढग
२५) एक तारवाद्य
२७) शिंपल्यातील पांढरे रत्न
२८) वसुंधरा
३०) प्रहार, घाव
३१) संपूर्ण नाश
३३) च्या बरोबर
३४) जिम्मेदार
३५) गावठी
३७) छांदिष्ट
३८) माळ, हार
४०) प्रयत्न
४२) कवाड, ताटी
४४) सुमार, तर्क
४५) खिडकीची पातळ काच
४७) अफूचे बीज
४९) मृत्यू नसलेला
५०) निमग्न, रममाण
५१) तेजस्वी, सुकुमार
५३) पूर्वज
५५) श्रीमंत
५६) एक पालेभाजी, पालनकर्ता
५७) तुरटपणा
५८) लेखणी
५९) सरस्वतीचे एक नाव
६०) घरातील मोठी माणसे
६२) फुलातील रज:कण
६३) पाठीला आलेली छोटी वक्रता
६४) रमणीय
६५) एक पक्षी.

**उभे शब्द :-**
१) ज्ञात, प्रख्यात
२) अर्धे अंग चेतनाहीन होण्याचा आजार
३) वजन, बोजा
४) एकसारखे, सदोदित
५) जोराने आवळणे
६) मनाची घालमेल, तडफड
७) ** वरवंटा
९) कबूतर
१२) पाकळ्यांचा कंद
१३) आश्चर्य
१४) युद्धाचे डावपेच
१६) सम, सारखा
१७) फुरसत, सवड
१९) बळ, शक्ती
२०) हिंदीत आतबाहेर
२१) बढाई, बडबड
२२) वाईट इच्छा
२६) कणकेचा वरवंट्यासारखा जाड भाजलेला गोळा
२७) म.गांधीजींचे नाव
२९) जादूगारी, जादूटोण्यासंबंधी
३०) उत्तराधिकारी
३२) एकूणएक, सर्व
३३) सरळ लांब वासा
३४) पाणी, जीवन
३६) बारा महिन्याचा काळ
३९) मातीचा कण
४०) फसवणूक
४१) सदोदित, नेहमी
४३) पहारेकरी
४४) सत्ता, अधिकार, कैफ
४६) अत्यंत नीच, दुष्ट माणूस
४७) वाळा
४८) रस्ता
४९) अत्यंत गरजेच्या वेळेला
५२) प्रजा, लोक
५४) उलट, विरुद्ध
५५) अखंड
५६) झाडाभोवतीचा कट्टा
५७) कृष्णसखा
५८) मडके
५९) भाजी
६१) सत्ता

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



## दुकानासमोरील अतिक्रमण काढण्यासाठी अंगावर घेतले पेट्रोल

**खामगाव (का.प्र):** फरशीवरील दुकानासमोर असलेले अतिक्रमण काढण्यासाठी वारंवार अर्ज देवूनही नगर परिषदेला प्रशासनाने टाळाटाळ करीत असल्याने एका इसमाने अंगावर पेट्रोल ओतले. ओल्या अंगाने हा इसम धावत नगर परिषदेच्या आवारात घुसला. त्यामुळे नगर परिषदेत एकच तारांबळ उडाली. ही घटना शुक्रवारी दुपारी घडली. शहर पोलिसांनी क्षणाचाही विलंब न लावता संदीप नटकुट रा. पुरवार गल्ली यांना त्वरित ताब्यात घेतले. त्यामुळे पुढील अनर्थ टळला. या प्रकरणी नगर परिषदेत नटकुट यांचे साळे विनोद मारुती ढगे यांनी २४ डिसेंबर २०२५ रोजी अतिक्रमण काढण्यासाठी अर्ज दिला असल्याचे समजते.

## थोडक्यात

### कै.कू. दुर्गा क.बनमेरू विज्ञान महाविद्यालयात आचार्य पदवी (पीएचडी) प्रवेश प्रक्रिया सुरू

**लोणार (महासागर प्रतिनिधी):** स्थानिक लोणार, येथील कै कू. दुर्गा क.बनमेरू विज्ञान महाविद्याल यामध्ये रसायनशास्त्र व प्राणीशास्त्र या विषयांमध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती ने Chemistry व Zoology रिसर्च लॅब ला मान्यता दिली असून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून महाविद्यालयात वरील विषयात पीएचडी करण्याकरिता रसायनशास्त्र विषयात ३ तर प्राणीशास्त्री विषयात २ जागा उपलब्ध असून यासाठी लागणारे पीएच.डी मार्गदर्शक डॉ. सूर्यकांत भानुदास बोरूळ व डॉ. कमलाकर कैलाश वाव्हळ हे रसायनशास्त्र विषयासाठी तर डॉ. मिलिंद विठ्ठल गायकवाड हे प्राणीशास्त्र विषयासाठी पीएच.डी मार्गदर्शक म्हणून उपलब्ध आहेत. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बनमेरु यांच्याकडून लोणार व परिसरातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना आव्हान करण्यात येते की, आपले प्रवेश हे दिनांक ३१ मार्च २०२६ पर्यंत निश्चित करावा सदर महाविद्यालयातील सुविधांचा आपण लाभ घ्यावा व आपले भविष्य उज्वल करावे.

### अ.खि. नॅशनल हायस्कूल मध्ये क्रिडा सप्ताह

**खामगाव (का.प्र.):** स्थानिक श्री. अरजण खिमजी नॅशनल हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील वर्ग ५ ते ८ च्या विद्यार्थ्यांच्या क्रीडा सप्ताहाचे ३ फेब्रुवारी रोजी उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा तथा कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या सौ.नंदा उदापूरकर होत्या. प्रमुख अतिथी तथा उद्घाटक म्हणून शाळेचे माजी विद्यार्थी असलेले शहरातील नामवंत अस्थिरोग तज्ञ डॉ.चेतन साटोटे हे होते. प्रास्ताविक विद्यार्थिनी कु.लक्ष्मी पिंपळकार हिने केले. विशाल बोरसल्ले यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. उद्घाटनपर भाषणात डॉ.साटोटे यांनी त्यांच्या शालेय जीवनातील आठवणी तसेच विद्यार्थी जीवनातील खेळाचे महत्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. त्यानंतर आनंद मेळ्यामध्ये आयोजित विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट प्रदर्शन करणाऱ्या ७५ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते राईटिंग पॅड बक्षीस देवून गौरव करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापिका सौ.उदापूरकर यांनी खेळात हार-जीत ही होतच असते आणि त्यातून खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांमध्ये खेळाडू वृत्ती विकसित होते. त्यामुळे मैदानात उतरुन खेळणे महत्वाचे आहे, असे सांगितले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कु. नम्रता घोलाईत वर्ग ७ वा हिने केले. संचालन विद्यार्थिनी कु.समीक्षा तायडे व कु.आराध्या डहाळे यांनी केले.

### धुपेश्वर येथे साधना अनुष्ठान निवासी शिबिर

**मलकापूर (महासागर प्रतिनिधी):** श्री क्षेत्र धुपेश्वर येथे पुर्णा माईच्या कुशीमध्ये अखिल विश्व गायत्री परिवार शांतिकुंज हरिद्वार उत्तराखंडच्या अंतर्गत ९ दिवसीय साधना निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. १६ फेब्रुवारी ते २४ फेब्रुवारीपर्यंत आयोजित या साधना निवासी शिबिरामध्ये १६ फेब्रुवारीपासून रोज संध्याकाळी पुर्णा मातेची आरती होणार असून शिबीर शांतीकुंज हरिद्वार उत्तराखंडच्या नियमावलीप्रमाणे होईल, अशी माहिती तहसील प्रतिनिधि अखिल विश्व गायत्री परिवार अरुण नवथळे यांनी दिली.

## १०२ रुग्णवाहिका चालकांना २१ महिन्यांपासून वेतन नाही

### मागण्या पूर्ण न झाल्यास आत्मदहनाचा इशारा

**लोणार (महासागर प्रतिनिधी):-** मागील २१ महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने बुलढाणा जिल्ह्यातील १०२ रुग्णवाहिकांच्या कंत्राटी चालकांवर उपासमारीची वेळ आली असून, त्यांनी आत्मदहनाचा इशारा दिला आहे. थकीत वेतन तातडीने देण्यात यावे, या मागणीसाठी चालकांनी मुख्यमंत्री सचिवालय व राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे जिल्हा आरोग्य विभागाच्या माध्यमातून ६ फेब्रुवारी निवेदन सादर केले आहे. मागील २१ महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने बुलढाणा जिल्ह्यातील रुग्णवाहिका कंत्राटी चालकांनी तीव्र संताप व्यक्त करत आत्मदहनाचा इशारा दिला.

मुलांचे शिक्षण, घरखर्च व औषधोपचार करणे कठीण झाल्याने परिस्थिती अत्यंत गंभीर बनली आहे. वारंवार निवेदने देऊनही कोणतीही ठोस कार्यवाही झाली नाही. यापूर्वी ११ जुलै २०२५ रोजी जिल्हा शल्यचिकित्सक बुलढाणा आणि उपसंचालक, आरोग्य सेवा अकोला मंडळाकडे कार्यवाहीची मागणी करण्यात आली होती.

न्याय न मिळाल्याने चालकांना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषणास बसावे लागले होते. त्यावेळी १५ दिवसांत १८ महिन्यांचे वेतन देण्याचे तोंडी आश्वासन देण्यात आले मात्र सात महिन्यांहून अधिक कालावधी उलटूनही वेतन मिळाले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. याशिवाय वेतन न देता अनेक कंत्राटी चालकांना कामावरून कमी केल्याने त्यांच्या कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे. लोणार येथील ग्रामीण रुग्णालयातील चालक गजानन दत्तराव देशमुख यांनी सर्व चालकांच्या वतीने मंत्रालयात आत्मदहनाबाबतचे निवेदन दिले होते. मात्र, ते मागे घेण्यास भाग पाडल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

कंत्राटी चालकांनी थकीत वेतन तातडीने देण्यात यावे कामावरून कमी केलेल्या सर्व चालकांना पुन्हा नियुक्ती द्यावी दर महिन्याचे वेतन पाच तारखेपूर्वी देण्याची व्यवस्था करावी बंद केलेल्या रुग्णवाहिका सुरू कराव्यात आदी मागण्या केल्या आहेत.१० फेब्रुवारीपर्यंत मागण्या पूर्ण न झाल्यास आत्मदहनाचा इशारा चालकांनी या निवेदनात देण्यात आला आहे.निवेदनावर सैय्यद वहीद सै. हमीद, संतोष काकड, सुरेंद्र चव्हाण, प्रवीण उमाळे, रमेश मुंडे, ऋषिकेश नागरे, जितेश जवंजाळ आदींच्या सह्या आहेत.

## निमगाव येथे शिवमहापुराण कथा व हरिनाम सप्ताह

**नांदुरा (महासागर प्रतिनिधी):-** महाशिवरात्री तसेच श्री गुरुवर्य श्रीराम महाराज जन्म शताब्दी वर्षानिमित्त श्री क्षेत्र संगमेश्वर संस्थान येरळी येथे ९ ते १६ फेब्रुवारीपर्यंत संगीतमय शिव महापुराण कथा व अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.



कथा प्रवक्ते परमपूज्य श्रद्धेय निरंजन भाईजी महाराज श्रीधाम वृंदावन उत्तरप्रदेश हे राहणार आहेत. यामध्ये दररोज सकाळी ५ ते ६ काकडा, ६ ते ७ विष्णुसहस्त्रनाम, सकाळी ९ ते १२ व दुपारी ३ ते ५ शिव महापुराण कथा, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, दररोज रात्री ८ ते १० ह.भ.प. शिवलीला पाटील शिवचरित्रकार तालुका बार्शी, गुरुवर्य तुकाराम महाराज सखारामपूर शिवा महाराज बावस्कर अकोला खुर्द, सोपान महाराज कनेरकर अमरावती, सौ. रुपालीताई सवणे परतुरकर, सोपान महाराज सानप शास्त्री हिंगोली, भरत महाराज चौधरी म्हैसवाडीकर तसेच १६ फेब्रुवारी रोजी हभप निरंजन भाईजी महाराज श्री धाम वृंदावन उत्तरप्रदेश यांचे काल्याचे कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. महाप्रसाद व दिंडी सोहळ्याने सदर कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

## रथसप्तमी दिनानिमित्त सहकार विद्या मंदिरमध्ये योग स्पर्धा



**बुलडाणा (महासागर प्रतिनिधी):** स्थानिक सहकार विद्या मंदिर येथे रथसप्तमी निमित्त बुधवार ४/०२/२०२६ रोजी शास्त्रशुद्ध पद्धतीने सूर्यनमस्कार प्रशिक्षण व स्पर्धा संपन्न झाली असून या स्पर्धेमध्ये इयत्ता सातवीच्या व च्या एकुण ६१५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून प्रत्येकी १२ सूर्यनमस्कार करून अडीच तासात एकूण ७३८० सूर्यनमस्कार केले.

बुलढाणा जिल्ह्यातील मास्टर ट्रेनर तथा योग शिक्षक श्रीमती कालिंदा नागरे, श्री.शिवाजी नागरे आणि श्रीमती स्वाती देगलूकर यांच्या मदतीने जालना जिल्ह्यातील छत्रपती योग व क्रीडा प्रशिक्षण केंद्र, अंबड येथील राज्य समन्वयक तथा योग तज्ञ श्री.देवा चित्राल सरांनी शास्त्रोक्त पद्धतीने श्वसनाची माहितीसह प्रात्यक्षिकातून विद्यार्थ्यांनी संगीताच्या ध्वनीवर योगिक जॉगिंग, वॉर्म अप घेऊन ओमकार साधना प्रार्थनेने सुरुवात करुन सूक्ष्म व्यायाम घेऊन सूर्यनमस्कार ची पूर्वतयारी निमित्त बटरफ्लाय, शिशुपालासण आणि मार्जरी व नाडी विभाजन ह्या पवनमुक्त हालचाली करून घेतल्या. प्रशिक्षणासाठी बीज मंत्रा सह ४ सूर्यनमस्कार घेऊन शेवटी स्पर्धेच्या निमित्ताने एकूण १२ सूर्यनमस्कार घेऊन लयबद्ध हालचालीत उत्कृष्ट व कलात्मक पद्धतीने सूर्यनमस्कारचे प्रशिक्षण सराव आणि स्पर्धा घेतली.

आदर्श कस्थती मध्ये सादरीकरण करणाया १३ विद्यार्थ्यांची निवड करून सर्वांना गोल्ड मेडल आणि प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.बुलढाणा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील क्रीडा अधिकारी श्रीनिवास प्रमुख पाहून म्हणून उपकस्थत होते. संस्थेच्या अध्यक्षा सौ. कोमल झंवर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व क्रीडा प्रशिक्षकांनी अथक परिश्रम घेत सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कु. लावण्या खानझोडे, सान्वी मोरे, क्रिष्णा गावंडे, वंशिका अग्रवाल, तेजश्री उबाळे, यज्ञी टेकाळे, चि.सुशांत तिफने, श्रीवेद कहाळे, प्रथमेश लहाणे, समरजीत ठाकरे, यश लक्कस, हर्षीत कुमावत, आर्या बेदरकर या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## जे भक्ती मार्गात असतील त्यांचे लग्न निश्चितच होतील

### ह.भ.प.संतदास महाराज गिरी यांचे प्रतिपादन



**संग्रामपूर (महासागर प्रतिनिधी):** प्रत्येकाला सुख पाहिजे मग प्राप्ती का होत नाही. सुख हे सुपा एवढे येते परंतु दुःखा पर्वता एवढे येते. सुखा नंतर दुःख येते.जो पर्यंत आपण तेथ पर्यंत जात नाही. तो पर्यंत सुख मिळत नाही. सर्वांचा संसार दुःखाचा आहे. परंतु संताचा सःसार हा नेहमी सुखाचा असतो. सुख प्राप्त करावयाचे असेल तर सुख म्हणजे देव-देव म्हणजेच सुख आहे. त्यासाठी परत्म्याला करणे व संताचे पायाला स्पर्श करणे आवश्यक आहे. संताचे पायावर मस्तक टेकवल तर ईश्वर मिळतोच. संताशिवाय देव मिळत नाही .तेव्हा कळत नाही.परंतु जेव्हा संत निघून जातात.तेव्हा ते कळतात. जे भक्ती मार्गात असतील त्यांचे लग्न निश्चितच होतील असे प्रतिपादन धर्मभुषण ह.भ.प.संतदास महाराज गिरी तोरनाळेकर यांनी प्रगट दिना निमित्त सुरु असलेल्या उत्सवाचे प्रसंगी दुसरे दिवशी ६ फेब्रुवारी रोजी किर्तनातून केले.

शहरात ५ ते ८ फेब्रुवारी पर्यंत श्री गजानन महाराज प्रगट दिन उत्सव निमित्तानं श्री विजय ग्रंथांचे सामुहिक पारायण, संत चरित्र विवरण व संकिर्तन सोहळ्याचे आयोजन ह.भ.प. एकनाथ महाराज पाचमासे गुरुजी यांचे मार्गदर्शनाखाली सुरु आहे. ६ रोजी उत्सवाचा दुसरा दिवस होता.

सदर कार्यक्रमासाठी सकाळी, दुपारी, व रात्री किर्तनासाठी भाविकांची गर्दी वाढत असून ७ फेब्रुवारी रोजी रात्री धर्मभुषण ह.भ.प.अनिल महाराज बोदडे यांचे किर्तन झाले. तर ८ फेब्रुवारी रोजी सकाळचे नियमितचे कार्यक्रम आटोपून स. ९ ते ११ वा.पर्यंत भागवताचार्य ह.भ.प. गोपाल महाराज गारमोडे (लासुरा खान्देश) यांचे काल्याचे किर्तन होवून श्री संत गजानन महाराज अधिष्ठान परिसरात १२ ते ४ वा.पर्यंतच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच संध्याकाळी ५ वा.माऊलीच्या पादुकांचा भव्य पालखी सोहळा आयोजित केला आहे.

**नियमित वाचा**
**महासागर**
बातम्या व जाहिरातींसाठी संपर्क
9561361404

## वहीगायन लोककलेच्या संवर्धनासाठी शासन कटीबद्ध - आ.चैनसुख संचेती

### डफा च्या गजरात वहीगायन महोत्सवाचा समारोप



**नांदुरा (महासागर प्रतिनिधी):-** खांदेशाच्या मातीत उगवलेली व विदर्भाच्या सिमावर्ती गावांमध्ये फुललेली वहीगायन लोककला लुप्त होण्याच्या मार्गावर असताना या लोककलेच्या जतन व संवर्धनासाठी लोककला महोत्सवाचे आयोजन करून या वहीगायन लोककलेच्या संवर्धना सोबतच लोककलावंताच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन आ. चैनसुख संचेती यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने दादगाव या.नांदुरा येथे ४,५ व ६ फेब्रुवारी तीन दिवसीय वहीगायन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

या महोत्सवासा चा समारोप आ.चैनसुख संचेती यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

आजच्या प्रसार माध्यमांच्या युगात आपली लोकसंस्कृती, लोकपरंपरा व लोककला लोप पावत चाललेली असताना तीच्या संवर्धनासाठी सांस्कृतिक कार्य विभागाच्या सांस्कृतिक धोरणाच्या माध्यमातून लोककला व लोककलावंतांच्या आनेक महत्वपूर्ण योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करून गावगाड्यातील लोककलावंच्या पाठीशी सरकार खंबीरपणे उभे राहील असे ही आ.संचेती यांनी लोककलावंना आश्वशीत केले.

या प्रसंगी भाजपाचे जेष्ठ नेते शिवाजीराव पाटील, माजी सभापती गजाननराव चरखे,पुंजाजी पाटील,पोलीस निरीक्षक सांगळे साहेब सरपंच सविताताई नारायन बघे, उपसरपंच श्रीराम निंबोळकर, सरपंच.रोटी संजय उगले,माजी सरपंच गणेश काटे, सुनील दळवी, तंटा मुक्ती अध्यक्ष किशना काटे, बूथ प्रमुख भाजप नारायण बघे, किसना बघे,निवास घुले,महादेव काटे,कैलास बघे,गणेश घुले,केशव मनस्कार, विठ्ठल भगत, आदि मान्यवर उपस्थित होते

वहीगायन महोत्सव समारोप प्रसंगी नुकताच वहीगायन लोककलेच्या क्षेत्रातील राज्य सांस्कृतिक पुरस्कार प्राप्त दादगावचे वही गायन लोककलावंत रामकृष्ण घुळे यांचा आ.संचेती साहेबांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला तसेच तीन दिवसीय महोत्सवात सहभागी झालेल्या नऊ वही मंडळातील वहीगायन लोककलावंतांना सन्मानचिन्ह व मानपत्र देऊन गौरव करण्यात आला

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महोत्सव समन्वयक विनोद ढगे यांनी केले तर उपस्थित मान्यवरांचे स्वागत दादगावचे नारायण बघे यांनी केले

राज्यातील लोककला, लोकपरंपरा व लोकसंस्कृतीचे जतन व संवर्धन व्हावे तसेच नवीन पिढीला आपल्या उच्च संस्कृतीची व परंपरेची ओळख व्हावी या उद्देशाने माननीय सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या अभिनव कल्पनेतून व, मुख्य सचिव सांस्कृतिक कार्य यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांच्या नियोजनात वहीगायन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते

महोत्सवास दादगाव सह नांदुरा तालुक्यातील निमगाव, रोटी, येरळी, अवधा, दादुलगाव, नारखेडे, हिंगंना ईसापर भोटा, कठोरा अलमपूर गोळेगाव येथील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली कार्यक्रम यशस्वीतेसाठी सचिन महाजन,मोहीत पाटील,संतोष चौधरी, अरविंद पाटील,अवधूत दलाल,यांनी परिश्रम घेतले

## जाहीर नोटीस

**सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर**
**नांदुरा, जि.बुलडाणा**

सक्शेशन केस नं. १/२०२६

अर्जदार :- १. भास्कर नामदेव सुरसे, वय अं. ४४ वर्षे, धंदा-शेती, २. संगीता रवींद्र सुरशे, वय अ. ४२ वर्षे, धंदा - घरकाम, ३. गोपाल रविन्द्र सुरशे, वय अं. २६ वर्षे, धंदा- शिक्षण ४. शिवशंकर रविंद्र सुरसे, वय अ. २२ वर्षे, धंदा-शिक्षण ५. ज्ञानेश्वरी रविंद्र सुरसे, वय अं. २० वर्षे, धंदा- शिक्षण, अर्जदार क्र.१ ते ५ रा. पातोंडा ता. नांदुरा जि. बुलढाणा, ६. मुक्ता संतोष लहुकार, वय अं. २४ वर्षे, धंदा-शिक्षण रा. भेंडवड बु., ता. जळगांव जामोद जि. बुलढाणा.

विरूध्द - गैरअर्जदार - कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मयत नामदेव दशरथ सुरशे हे दि. २८/०४/२०२५ रोजी पातोंडा ता.नांदुरा जि.बुलढाणा येथे मयत झाले असुन ते पातोंडा ता. नांदुरा जि. बुलढाणा येथीलच रहीवाशी होते. तसेच मयत नामदेव दशरथ सुरशे यांना त्यांच्या मृत्युपश्चात अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत. त्यांचे व्यतिरीक्त कोणीही कायदेशीर वारस नव्हते व नाही. मयत नामदेव दशरथ सुरशे यांचे नावे सेंट्रल बँक शाखा निमगांव येथे रक्कम रु. ५०,८७४/- जमा आहे. सदर रक्कम मयत नामदेव दशरथ सुरशे यांच्या वारसांना मिळणेसाठी सदर प्रकरण वि. न्यायालयात दाखल केले आहे. सबब, मयत नामदेव दशरथ सुरशे यांचे मृत्युपश्चात वर उल्लेख केलेले वारस असल्याबाबत त्यांचे नावाने वारस प्रमाणपत्र देण्यास व बँकेत जमा असलेली रक्कम वरील वारसांना देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी दि. ९/३/२०२६ रोजी अथवा सदर तारखेच्या आत स्वत: अथवा आपले वकीलामार्फत वि.कोर्टात हजर होउन आपली लेखी हरकत नोंदवावी अन्यथा कोणाचे काहीही म्हणणे नाही असे समजुन वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

करीता ही जाहीर नोटीस

दि. १६/१/२०२६

शिक्का

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदुरा, जि.बुलडाणा

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब क.स्तर, कोर्ट, संग्रामपूर**
यांचे न्यायालय

एम.जे.सी. नं. २७/२०२६ ने. ता.२३/०३/२०२६

अर्जदाराकरीता :- ॲड.एस.आर.गायकी संग्रामपूर, ८९७५५५२००९

अर्जदार :- १) रूख्माबाई नारायण हागे वयः अं.७५ वर्षे, व्यवः- घरकाम रा. सुनगांव ता. जळगांव जा. जि. बुलडाणा., २) जनाबाई रविंद्र राऊत (मयत) २अ) संतोष रविंद्र राऊत (मयत) २ब) आदित्य संतोष राऊत वयः अं. २४ वर्षे, व्यवः शेती, २ क) उदय संतोष राऊत वय : अं. २१ वर्षे, व्यवः शिक्षण, २ ड) मनिष संतोष राऊत वय : अं. १९ वर्षे, व्यवः शिक्षण क्र.२ अ) ते ३ ड) रा. सुनगांव ता. जळगांव जा. जि.बुलडाणा, ३) द्वारकाबाई रामचंद्र हागे वयः अं. ७० वर्षे, व्यवः घरकाम रा. सोगोडा ता. संग्रामपुर जि.बुलडाणा, ४) महादेव बळीराम डाबरे (मयत) ४अ) श्रीमती सुमन महादेव डाबरे वयः अं. ६७ वर्षे, व्यवः घरकाम ४ ब) गणेश महादेव डाबरे वयः अं.३८ वर्षे, व्यवः शेती, ४क) अर्जुन महादेव डाबरे वयः अं. ३५ वर्षे, व्यवः शेती, क्र.४अ) ते ४क) रा. वरवट बकाल) ता. संग्रामपुर जि.बुलडाणा. ४ड) श्रीमती आशा संतोष राऊत वयः अं.सज्ञान व्यवः- घरकाम सुनगांव ता. जळगांव जा. जि.बुलडाणा. ५) प्रल्हाद बळीराम डाबरे वयः अं.६८ वर्षे, व्यवः शेती, ६) भगवान बळीराम डाबरे वय:अं. ६६ वर्षे, व्यवः शेती क्र. ६ व ७ रा.वरवट बकाल ता. संग्रामपुर जि.बुलडाणा. ७) निर्मला काशिराम घायल (मयत), ७ अ) वासुदेव काशिराम घायल वयः अं. ४३ वर्षे, व्यवः शेती ७ब) दिलीप काशिराम घायल वयः अं. ४० वर्षे, व्यवः - शेती, ७ क) अशोक काशिराम घायल वयः अं.३८ वर्षे, व्यवः शेती, क्र.७अ) ते ७ क) रा. वरवट बकाल, ता. संग्रामपुर जि.बुलडाणा. ८) गजानन बळीराम डाबरे वयः अं.५८ वर्षे, व्यवः सेवानिवृत्त, रा. सितानगर, वर्धा रोड, नागपुर ता. जि. नागपुर ९) सौ. कुसुम पुजांजी राऊत वयः अं. ५५ वर्षे, व्यवः घरकाम रा. सोगोडा ता. संग्रामपुर जि.बुलडाणा.- विरूध्द -कोणीही नाही

अर्ज- मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ मधील तरतुदी नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता

या जाहीर नोटीसद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार क. १,२,३,४,५,६, ७, ८, ९, यांचे वडील बळीराम मनाजी डाबरे यांचे दि. २४/०३/२०१२ रोजी व त्यांची पत्नी पार्वताबाई बळीराम डाबरे हिचे दि. २४/०१/२०१२ रोजी निधन झाले. ते मौ. वरवट बकाल ता. संग्रामपुर जि. बुलडाणा. येथील रहीवाशी होते. त्यांच्या मृत्यू पश्चात अर्जदार क. १, २, ३, ७, व ९ ह्या त्यांच्या विवाहीता मुली व अर्जदार क. ४, ५, ६ व ८ त्यांचे मुल कायदेशिर वारस आहेत. मयत बळीराम मनाजी डाबरे व पार्वताबाई बळीराम डाबरे यांच्या वरील नमुद वारसांपैकी अर्जदार क. २ जनाबाई रविंद्र राऊत हिचा दि.२८/१२/२०२० रोजी मौजे सुनगांव ता.जळगांव जा. जि.बुलडाणा येथे मृत्यु झाला. जनाबाई हिच्या मृत्यू नंतर तिला अर्जदार क. २अ संतोष रविंद्र राऊत हा तिचा मुलगा कायदेशिर वारस होता. परंतु त्याचे दि.२६/१०/२०१५ रोजी मौजे सुनगांव ता. जळगांव जा. जि.बुलडाणा येथे निधन झाले आहे. त्यामुळे मयत जनाबाई व तिचा मयत मुलगा संतोष रविंद्र राऊत यांना अर्जदार क्र. २ब ते २ड हे कायदेशिर वारस आहेत. मयत बळीराम मनाजी डाबरे व पार्वताबाई बळीराम डाबरे यांच्या वरील नमुद वारसांपैकी अर्जदार क्र. ४ महादेव बळीराम डाबरे दि.२६/०९/२०२५ रोजी वरवट बकाल ता.संग्रामपुर जि.बुलडाणा येथे मृत्यू झाला असुन त्यांना अर्जदार क्र. ४अ ते ४ड हे कायदेशिर वारस आहेत. मयत बळीराम मनाजी डाबरे व पार्वताबाई बळीराम डाबरे यांच्या वरील नमुद वारसांपैकी अर्जदार क्र.७ निर्मला काशिराम घायल हिचे दि.१२/०९/२०२१ रोजी वरवट बकाल ता. संग्रामपुर जि. बुलडाणा येथे निधन झाले असुन तिला अर्जदार क. ७अ ते ७क हे कायदेशिर वारस आहेत. त्या अर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदारांनी दाखल केलेल्या प्रकरणातील वारसांच्या म्हणण्याबाबत वारस हक्क प्रमाणपत्र देण्याबाबत कुणाची, काही हरकत अथवा उजर असल्यास दि.२३/०३/२०२६ रोजी किंवा त्या पुर्वी नेमलेल्या तारखेवर सकाळी ठिक ११ वाजता वि. न्यायालयात हजर अशी होवुन त्यानी आपल्या हरकती प्रकरणात लेखी स्वरूपात सादर कराव्यात, कोणतीही हरकत वा उजर प्राप्त न झाल्यास वरील प्रकरणात पुढील कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल. अर्जदारांना त्यांच्या नावे वारसा हक्क प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.६/२/२०२६ रोजी माझे सहिने व न्यायालयाच्या शिक्कानीशी दिली.

शिक्का

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायाधीश क.स्तर कोर्ट,संग्रामपूर, जि.बुलडाणा

RNINO-46973/1986 Mahasagar Akola Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. Group Editor-in-Chief and Managing Director - Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale. Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak Local Editor - Purushottam Madhukarrao Dhole. Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023

आर.एन.आय. नोंदणी क्र. ४६९७३/१९८८ महासागर अकोला मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, खामला स्केअर दुर्गा चौक, अकोला येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक, स्थानिक संपादक : पुरूषोत्तम मधुकरराव ढोले. फोन: ९८८१४८९४७९ (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील)

# भक्तिमार्ग

**कोणताही धर्म कितीही सनातन असला तरी तो सनातन आहे म्हणजेच परिवर्तनशील आहे. कारण साठलेला धार्मिक विचार समाजात परिवर्तन घडवू शकत नाही. धर्म हा ईश्वरनिर्मित, निसर्गनिर्मित नाही तर तो मानवनिर्मित आहे. तो माणसाने निर्माण केलेला अनुशासनाचा मार्ग आहे. अलीकडेच एका व्याख्यानाप्रसंगी ज्येष्ठ निरूपणकार विवेक घळसासी यांनी अध्यात्म आणि अंधश्रध्दा या विषयावर मार्मिक विचार मांडले. त्याचा हा गोषवारा.**

## आवश्यकता परिवर्तनशील धर्माची

सध्याच्या काळात अध्यात्म आणि अंधश्रध्दा हे मुद्दे चर्चेत असतात. परंतु त्या संदर्भात अधिक तपशीलाने विचार होणे आवश्यक आहे. सर्वात प्रथम एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी ती म्हणजे निव्वळ पोथीनिष्ठ धर्म हा कालत्रयी असू शकत नाही. कोणताही धर्म कितीही सनातन असला तरी तो सनातन आहे म्हणजेच परिवर्तनशील आहे. कारण साठलेला धार्मिक विचार समाजात परिवर्तन घडवू शकत नाही. साहजिक परिवर्तनशील नसणाऱ्या, मानवी हेतूशी विसंगत असणाऱ्या धर्मात वैचारिक जागृतीची अधिक आवश्यकता असते. मुख्यत्वे धर्म हा ईश्वरनिर्मित, निसर्गनिर्मित नाही तर तो मानवनिर्मित आहे. तो माणसाने निर्माण केलेला अनुशासनाचा मार्ग आहे. या पार्श्वभूमीवर या देशातील बहुसंख्य हिंदूंना आपल्या धर्माविषयी नेम की माहिती नाही असे म्हणावे लागेल. कपाळाला गंध लावला, गळ्यात विविध माळा घातल्या की आपण धार्मिक झालो असा एक समज आढळतो. रोज पोथी वाचतो, यात्रांना जातो म्हणजे आम्ही धार्मिक आहोत असाही समज दिसून येतो. परंतु या साऱ्या गोष्टींचा धर्माशी नव्हे तर धर्माच्या प्राथमिकतेशी संबंध आहे हे लक्षात घ्यायला हवे. वास्तविक धर्माकडे पाहण्याचा दृष्टीकोन विवेकनिष्ठ हवा आणि आम्ही मात्र धर्माची तयार वस्त्रालये शोधून पसंत पडेल ते वस्त्र घेतो.



नाशिकला एक मोठे महात्म्ये होते. त्यांचे अध्यात्माच्या क्षेत्रात मोठे नाव होते. त्यांच्या अनुयायांची संख्या मोठी होती. एकदा तेथे साथीच्या आजाराने थैमान घातले. तेव्हा या महात्म्याने घोषणा केली की, सर्वांनी गोदावरी किनारी यावे. त्याप्रमाणे सर्वजण गोदावरीच्या तीरावर जमले. तिथे उपस्थितांना कणकेचे गोळे आणि कागदाचे तुकडे देण्यात आले. त्या कागदाच्या तुकड्यांवर ङ्कश्रीरामङ्क असे म्हणून ते तुकडे आणि कणकेचे गोळे गोदावरी नदीत सोडून द्यावेत असे सांगण्यात आले. अशा पध्दतीने एक लाख कागदाचे तुकडे आणि कणकेचे गोळे गोदावरीत सोडल्यास साथीचा विकार दूर होईल असा त्या महात्म्याचा दावा होता. त्यावर ङ्ककणकेच्या गोळ्यांनी साथीचा आजार जातो हे आताच मला कळलेङ्क अशा शब्दात स्वातंत्र्यवीर सावरकरांनी त्या प्रकाराबाबतची नापसंती व्यक्त केली होती. अशी उदाहरणे समोर येत असतील तर त्या समाजाचे परिवर्तन झाले असे कसे म्हणणार? खरे तर समाजाच्या वैचारिक परिवर्तनाचे काय, ते कोठे झाले, असे प्रश्न समोर आल्याशिवाय राहत नाही.

हल्ली दर शनिवारी, आमावस्येला शनीच्या मंदिरात होणाऱ्या गर्दीचा वयोगट लक्षात घेतला तर त्यात तरूणाईचा भरणा अधिक आढळतो. शनी वक्री असेल तर त्याला तेल घातल्यावर तो मार्गी येतो, असा समज आहे. दर शनिवारी शनिला तेल वाहिल्यास संकटे दूर होतात, समाधान मिळते असेही मानले जाते. परंतु याच विचारातून दर शनिवारी शनिच्या डोक्यावर तेलाचा सतत अभिषेक सुरू असतो. अशा पध्दतीने खरेच पुण्य लाभत असते तर तेलाच्या घाण्याला जोडलेला बैल पुढच्या जन्मी देव झाला असता.

आजकाल बहुतेकांना पितृदोष असल्याचे सांगितले जाते. इतक्या साऱ्यांना पितृदोष कसा होऊ शकतो, याचा अर्थ पूर्वीची सगळी पिढीच तशी होती का, या प्रश्नाचा विचार मात्र कोणी करत नाही. सध्या श्रध्देच्या नावाखाली आपण जे काही करतो त्यात वेडेपणा पुरेपूर भरला आहे. घरात लाफींग बुध्दा ठेवला तर वातावरण समाधानी राहील असे म्हटले जाते. शिवाय घराचा दरवाजा अमूक दिशेला असेल तर प्रसन्नता लाभते, समृध्दी प्राप्त होते असे म्हटले जाते. परंतु घराचा दरवाजा कोणत्याही दिशेला असला तरी त्यातील माणसांची तोंडे वेगवेगळ्या दिशांना असतील तर कुटुंबात समाधान कसे नांदणार हा खरा प्रश्न आहे. परंतु तो लक्षात घेतला जात नाही. आपल्याकडे आमावस्या कोणत्याही शुभ कार्यासाठी उचित समजली जात नाही. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांच्या बहुतांश मोहिमा आमावस्येलाच पार पडल्या हे लक्षात घ्यायला हवे. याच मोहिमांच्या सहाय्याने शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण केले. हा इतिहास असताना त्याकडे लक्ष न देता ङ्कआज आमावस्या असल्याने मी हे काम करणार नाही किंवा अमूक एका कामाचा शुभारंभ करणार नाहीङ्क असे म्हणणाऱ्यांची संख्या मोठी आहे. खरे तर आयुष्यात प्रगती साधण्यासाठी, इच्छित प्राप्त करण्यासाठी स्वतःच्या मनगटावर विश्वास हवा, कुंडलीवर नको. असे असताना आजच्या प्रगत विज्ञानयुगातही नवस बोलले जातात आणि ते फेडलेही जातात.

भक्ती विशेष

अंधश्रध्दा ही समाज जागृतीला बाधक आहे आणि वैज्ञानिक अंधश्रध्दा तर अधिक बाधक आहे. त्यामुळे मानवी जीवनाचा हेतू काय, या प्रश्नाचा विचार केला जाण्याची आवश्यकता आहे. मानवी जिवनाचा परमोच्च अधिकारी व्हावे असे अवघ्यांना वाटते. ती क्षमताही साऱ्यांमध्ये आहे. गरज आहे ती ओळखण्याची. ती क्षमता प्रकट होण्याची. मुख्यत्वे देवत्व बाहेरून येत नाही, ते आतूनच विकसित होते हे लक्षात घ्यायला हवे. त्यामुळे मानवाने बाहेरून विकसित होण्यापेक्षा आतून विसिक होणे अधिक महत्त्वाचे ठरते. कर्मकांड वाईट नाही. परंतु ते नुसतेच कांड नाही ना, हे पाहिले पाहिजे. वेदांमध्ये कर्मकांड हा स्वतंत्र विषय राहिला आहे. तो जीवन चांगले होण्यासाठी आवश्यक आहे. अधर्माचे कर्मकांड असता कामा नये. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे वेदातील समर्थ रामदासांनी म्हटलेच आहे की, ङ्कजगी सर्व सुखी असा कोण आहे। विचारी मना तूचि शोधूनी पाहेङ्क त्यामुळे वैचारिक परिवर्तन हाच समाजाचा मुख्य आधार असून तोच पाया भक्कम करण्याची आवश्यकता आहे.

## कसं बनावं सकारात्मक

सेल्फ हेल्प

आपल्या आयुष्यात विचारांना प्रचंड महत्त्व आहे. विचारांप्रमाणे आपलं आयुष्य घडत असतं. म्हणूनच प्रत्येकाने सकारात्मक विचारांचा अवलंब करायला हवा. सकारात्मक विचारांचं महत्त्व प्रत्येकाला माहित असतं पण आपल्या आयुष्यात त्याचा अवलंब करताना बऱ्याच अडचणी येतात. आपण कायमच नकारात्मकतेच्या मागे लागतो. आपल्याला अनेक चिंता सतावत असतात. त्यातून बाहेर पडण्यासाठी सकारात्मक विचार आपल्या कामी येतात. सकारात्मक विचारांमध्ये वृद्धी करण्यासाठी हे उपाय उपयुक्त ठरू शकतात.



* आयुष्यात चढ-उतार येत राहतात. अपयशामुळे निराश, हताश होण्याचं काहीच कारण नाही. अपयश आलं की त्यातून बरंच काही शिकता येईल. अपयश ही यशाची पुढची पायरी असते असं म्हटलं जातं. त्यामुळे अपयशातून शिकून भविष्यातल्या चुका टाळता येतात.
* मनात कायम कृतज्ञ भाव ठेवा. कठिण प्रसंगातली मदत कायम लक्षात ठेवा. यामुळे तुम्हाला कायम सकारात्मक वाटेल. नकारात्मक विचार दूर राहतील.
* आयुष्य म्हटलं की आव्हानांचा सामना करावा लागतोच पण ही आव्हानं आली की डगमगू नका. समस्या सोडवण्यासाठी योजना आखा. यामुळे नकारात्मक विचार दूर होतील.
* सतत तक्रारी करू नका. आयुष्य, नोकरी, घर, संसार याबाबत कायम रडत बसू नका. मनात सकारात्मकता भिनवा. आपल्याला जे मिळालंय ते चांगलं आहे हाच विचार करा. सततच्या तक्रारींमुळे तुमचं आयुष्य नकारात्मकतेने भरून जातं.
* इतरांवर उपकार करा पण या उपकारांचा कुठेही उल्लेख करू नका. परोपकार करा आणि विसरून जा. उजव्या हाताने दिलेलं दान डाव्या हातालही कळू नये, इतकं गुप्त असावं, असं सांगितलं जातं. आपण केलेल्या उपकारांचे गोडवे गात बसू नका. इतरांना त्याची जाणीव करून देऊ नका. आपलं कर्म करत रहा.



## मंदिर देवी सरस्वतीचं

तीर्थक्षेत्र

आदिशक्ती म्हणजेच देवीची विविध रूपं आहेत. दुर्गा ही शक्तीची देवता आहे, लक्ष्मी धनाची तर सरस्वती विद्येची देवता मानली जाते. दुर्गादेवी आणि देवीच्या इतर रूपांची अनेक मंदिरं असली तरी सरस्वतीच्या मंदिरांची संख्या मर्यादित आहे. आंध्र प्रदेशमधल्या आदिलाबाद जिल्ह्यातल्या मुधोळ परिसरात बासर नावाचं गाव आहे. या गावातून गोदावरी नदी वाहते. गोदावरीच्या किनाऱ्यावर देवी सरस्वतीचं भव्य-दिव्य मंदिर वसलंय. जम्मू-काश्मीरमधल्या लेहमध्ये सरस्वतीचं असंच मोठं मंदिर आहे. बासर गावातलं हे मंदिर वैशिष्ट्यपूर्ण आहे. या मंदिराबाबत एक कथा सांगितली जाते. ती अशी की, अनेक समस्यांनी ग्रासलेल्या महर्षी व्यासांनी मानसिक शांती आणि समाधानासाठी तीर्थयात्रेला निघाले. इतर ऋषीमुनींसोबत ते उत्तर भारतातल्या तीर्थस्थळांकडे रवाना झाले. यानंतर ते दंडकारण्यात पोहोचले. हे दंडकारण्य म्हणजे आजचं बासर गाव. गोदावरीच्या किनाऱ्याच्या सौंदर्याने भाळलेले व्यास काही काळ तिथेच थांबले.

सरस्वती मंदिरापासून काही अंतरावर दत्त मंदिर आहे. या दत्त मंदिरापासून सरस्वती मंदिरात जाण्यासाठी गोदावरी नदीच्या डोहात एक बोगदा होता, असं म्हणतात. त्या वेळचे राजे-महाराजे सरस्वतीच्या मंदिरात जाण्यासाठी बोगद्याचा वापर करत असत, असंही सांगितलं जातं. रामायण रचण्याआधी वाल्मिकीऋषींनी या ठिकाणी देवी सरस्वतीच्या मूर्तीची स्थापना करून आशीर्वाद घेतल्याचंही बोललं जातं. या मंदिराच्या जवळच महर्षी वाल्मिकींची समाधी आहे. या मंदिरात देवी सरस्वती आणि लक्ष्मी यांच्या मूर्ती आहेत. देवी सरस्वतीची पद्मासनात बसलेली मूर्ती अत्यंत विलोभनीय आहे. इथे येणाऱ्या प्रत्येक भक्ताला देवी प्रसन्न चेहऱ्याने आशीर्वाद देत असते.

या मंदिरातल्या एका स्तंभातून संगीताचे सप्त-सूर ऐकू येतात. या मंदिरात अक्षरआराधना केली जाते. मुलांना शाळेत घालण्याआधी इथे आणलं जातं, त्यांचा अक्षराभिषेक केला जातो. प्रसाद म्हणून हळदीचा लेप दिला जातो. अक्षरआराधनेमुळे मुलं बुद्धीवान होतात, त्यांच्यावर देवी सरस्वतीची कायम कृपा राहते, अशी भाविकांची श्रद्धा आहे.

## उत्तम आरोग्य राखायचंय

वास्तू भक्ती

प्रत्येक माणसाला दीर्घायुष्य आणि उत्तम आरोग्य हवं असतं. रात्रीची शांत झोप, तणावविरहित जीवन, योग्य आहार-विहारातून आपल्याला आरोग्याचा लाभ होत असतो. यासोबतच वास्तूशास्त्र आणि फेंगशुईतले काही उपाय शांत झोप आणि आरोग्य या दोन्हींसाठी उपकारक ठरतात. अशाच काही सरळ-साध्या उपायांविषयी...

* फेंगशुई शास्त्रात आपल्या आयुष्याचं प्रतिबिंब उमटलेलं असतं. उद्याचा दिवस कसा असेल हे झोपण्याच्या स्थानावरून ठरतं, असं फेंगशुई शास्त्रात नमूद करण्यात आलंय. त्यामुळे घराच्या कोपऱ्यात बेडरूम असावी. चीनमधल्या लोकांचा यावर प्रचंड विश्वास आहे. असं केल्याने चांगली झोप येते आणि आरोग्य उत्तम राहतं, असं त्यांचं म्हणणं आहे.
* घराच्या सभोवताली झाडं लावल्याने उत्तम आरोग्याचा लाभ होऊ शकतो, असं फेंगशुईशास्त्र सांगतं. झाडांमुळे आपल्या आसपासच्या वातावरणात सकारात्मकता नांदू लागते. झाडं लावणं शक्य नसेल तर घरात लाकडाचं फर्निचर असू द्या.



* तीन पायांच्या बेडकाला फेंगशुई शास्त्रात बरंच महत्त्व आहे. अशा बेडकाची प्रतिकृती घरात ठेवणं लाभदायी आणि भाग्यकारक मानलं जातं. तोंडात नाणी असलेला तीन पायांचा बेडूकही घरी ठेवता येईल. हा बेडूक मुख्य प्रवेशद्वाराजवळ ठेवावा.
* पादत्राणं घालून घरात प्रवेश करणं फेंगशुईत निषिद्ध मानलं गेलंय. पादत्राणांमध्ये दिवसभराची नकारात्मक ऊर्जा, ताणतणाव साठलेले असतात. त्यामुळे पादत्राणांसह घरात प्रवेश केल्याने ही नकारात्मक ऊर्जा, ताण घरात शिरतात. म्हणूनच चप्पल नेहमी घराबाहेर ठेवावी.
* घर नेहमी स्वच्छ आणि टापटिप असावं. यामुळे घरात सकारात्मक ऊर्जा नांदते.
* या उपायांमुळे शरीर ताणतणावांना स्वतःच दूर ठेऊ लागतं आणि आपण उत्साही व आनंदी राहतो.

**भगवान शंकराबद्दल भक्तांच्या मनात कुतुहल आहे. तांडवनृत्य करणारी, प्रसंगी तिसरा डोळा उघडणारी ही देवता भक्तांच्या आराधनेने प्रसन्न होते. शंकराला भोळा सांब म्हटलं जातं. शंकराने आपल्या शरीरावर विविध गोष्टी धारण केल्या आहेत. त्याच्या माथ्यावर चंद्र आहे. त्याच्या हातात डमरू आहे. गळ्यात रूद्राक्षाची माळ आहे. शंकराने धारण केलेल्या प्रत्येक प्रतिकाचं वेगळं महत्त्व आहे. या प्रतिकांविषयीची ही रंजक माहिती...**

## अर्थ शंकराच्या शरीरावरील प्रतिकांचे

जाणून घ्या

शंकराने आपल्या जटेत चंद्र धारण केलाय. शिव हे तत्त्व मानसिक विकारांपासून दूर आहे. चंद्र मनाचं प्रतिक मानला जातो. मनोविकारांपासून दूर गेलेला मनुष्य भगवंताचं निर्गुण रूप जाणून घेऊ शकत नाही. या स्थितीला समजून घेऊ शकत नाही. भगवंताला समजून घेण्यासाठी मनाचा थोडा तरी विचार करावा लागतो. अव्यक्ताला व्यक्त करण्यासाठी शंकराने माथ्यावर चंद्र धारण केलाय.



* शंकराचा डमरू या ब्रह्मांडाचं प्रतिक मानलं जातं. ब्रह्मांड विस्तारतं आणि विलिन होत जातं. ही प्रक्रिया निरंतर सुरू असते. हाच या सृष्टीचा नियम आहे. हृदयाची धडधड कधीही सरळ रेषेत नसते. या धडधडीला एक लय असते. हे संपूर्ण जगच लयीत चालतं. ऊर्जा वर जाते, पुन्हा खाली येते. अशा प्रकारे तिचं पुनरूत्थान होत असतं. डमरू याच लयीचं प्रतिक आहे. डमरू हे ध्वनीचं प्रतिक आहे. ध्वनी लय आहे. ध्वनी ऊर्जाही आहे. आपलं ब्रह्मांड लहरींचा पुंजका आहे. यात वेगवेगळी कंपनं आहेत. डमरू ब्रह्मांडाच्या याच स्वभावाचं प्रतिक मानलं जातं.
* गळ्यातला नाग समाधीवस्थेचं प्रतिक आहे. समाधीवस्थेत माणसाला कशाचंच भान रहात नाही. याच ठिकाणी शिवाचं अस्तित्त्व असतं. या अवस्थेत आपण सजग असतो पण कमीची कोणतीही जाणीव नसते. याच सजगतेचं प्रतिक म्हणजे शंकराच्या गळ्यातला सर्प.
* शंकराचं त्रिशूळ चेतनेच्या तीन अवस्थांचं प्रतिनिधित्त्व करतं. जागृत, स्वप्न आणि सुषुप्ति या त्या तीन अवस्था होत. यासोबतच सत्व, रज आणि तम या गुणांचंही ते प्रतिक आहे. शूल म्हणजे समस्या किंवा दुःख. त्रिशूळ म्हणजे सर्व पिडांचा नाश करणारं. हे त्रिशूळ शंकराने धारण केलंय.
* शिवाने जटेत गंगा धारण केली आहे. गंगा म्हणजे ज्ञान. या ज्ञानामुळे आपला आत्मा शुद्ध होतो. गंगा हे शुद्धतेचं प्रतिक मानलं जातं. मस्तकात ज्ञान असतं. ज्ञान मुक्तीदायी आहे. ज्ञानामुळे आपण शुद्ध होतो. ज्ञानामुळे आत्मविश्वास जागृत होतो. ज्ञानात गती आहे, धार आहे. म्हणूनच गंगा हे ज्ञानाचं आणि शिव हे दिव्यतेचं प्रतिक मानलं जातं.
* नंदी बैल हे शिवाचं वाहन आहे. बैलाला धर्माचं प्रतिक मानलं जातं. शिवाचं नंदी बैलावर आरूढ होणं धर्म आणि सत्याच्या मार्गावर मार्गक्रमण करण्याचं प्रतिक आहे.
* शंकराचं शरीर निळं आहे. निळं म्हणजे असीम, अनंत. आकाशासारखं. निळा रंग अनंताचं प्रतिक मानलं जातो. याचं कोणतंही रूप नाही. तसंच शिवाचंही शरीर नाही. शिवाचं कोणतंही रूप नाही. संपूर्ण जग शिवमय आहे. हे ब्रह्मांड शिवाचं रूप आहे.
* शिवाचं तांडव नृत्य चेतनेचं प्रतिक आहे.

## मार्ग धर्मप्रसाराचा

धर्म देशोदेशीचे



पुरातन काळापासून संत आणि थोर पुरूषांनी धर्माचा प्रसार आणि प्रचार केला. विविध धर्मातल्या संतांनी आपले विचार लोकांपर्यंत पोहोचवले. हे विचार आजच्या काळालाही लागू पडतात. हे विचार मौखिक आणि लिखित माध्यमांद्वारे आपल्यापर्यंत पोहोचले. भारताप्रमाणे इतर देशांमध्येही अध्यात्माचा प्रचार आणि प्रसार झाला. महान व्यक्तींनी आपल्या वाणीने लोकांना प्रभावित केलं. आपला धर्म कसा श्रेष्ठ ते पटवून दिलं. जगभरात अध्यात्म, धर्माचा प्रसार मौखिक माध्यमातूनच झाला. गौतम बुद्ध हे याचं उत्तम उदाहरण मानलं जातं. भारत हे बौद्ध धर्माचं उगमस्थान मानलं जातं. गौतम बुद्धांनी भारतासह चीन, जपानसारख्या देशांमध्येही बौद्ध धर्माचा प्रसार केला. आपल्या विचारांच्या प्रसारासाठी त्यांनी प्रवचनाचं माध्यम स्वीकारलं. जगाच्या कानाकोपऱ्यात ज्ञानाचा प्रसार झाला तो मौखिक माध्यमातूनच. भारतात गौतम बुद्धांनी बौद्ध तत्त्वज्ञानाचा तर महावीर यांनी जैन तत्त्वज्ञानाचा प्रसार केला. महावीर आणि बुद्ध यांच्याप्रमाणे चीनमध्येही दोन संत धर्माचा प्रसार करत होते. लाओत्से आणि कनफ्युनियस या दोघांनी चीनमध्ये ज्ञानाचा प्रसार केला. हे दोघं चीनमधले प्रशासकीय अधिकारी होते. पण नंतर त्यांनी अध्यात्ममार्ग निवडून लोकांना आपलं अनुयायी बनवलं. लाओत्से कनफ्युनियसपेक्षा ज्येष्ठ होते असं म्हणतात. त्यांच्या वयात बरंच अंतर असल्याचं इतिहास तज्ज्ञांचं म्हणणं आहे. कनफ्युनियस यांनी समाजसुधारणेवर भर दिला तर लाओत्से यांनी अध्यात्मिक मार्ग अंगीकारला. या दोघांनीही स्वतःकडचं ज्ञान इतरांना दिलं. त्यामुळे त्यांच्या ज्ञानातही भर पडली. यामुळे पुरातन काळापासूनच मौखिक माध्यमातून ज्ञानप्रसार होत असल्याचं आपल्या लक्षात येईल.

## नका गाजवू हक्क

बोध

या जगातल्या कोणत्याही वस्तूवर हक्क गाजवता कामा नये. चंद्र, तारे, सूर्य, आकाश हे सगळं निसर्गनिर्मित आहे. यात मानवाचा कोणताही सहभाग नाही. नद्या, झरे, पर्वत, अग्नी, पृथ्वी यापैकी काहीही मानवनिर्मित नाही. या जगातले प्राणीमात्रही मानवनिर्मित नाहीत. त्यामुळे या जगावर सत्ता गाजवण्याआधी दहा वेळा विचार करणं गरजेचं आहे. एवढंच काय, माणसाच्या निर्मितीलाही तो स्वतः जबाबदार नाही. माणूसही निसर्गानेच तयार केलाय. नैसर्गिक साधनसामुग्रीचा वापर करून माणसं विविध वस्तू तयार करतात आणि याचं सगळं श्रेय स्वतः घेतात. निसर्गात पूर्वीपासूनच असलेल्या नियमांचा शोध मानवाने लावला पण या नियमांचं पालकत्त्व निसर्गाकडेच राहिलंय. त्याचा शोध माणसाने लावलाय इतकंच. म्हणूनच आपल्या शक्तीचा, सर्वश्रेष्ठ असल्याचा दुराग्रही अभिमान कधीही बाळगू नये. माणूस वस्तूंची निर्मिती करतो. या वस्तूंना आपलं मानू लागतो. त्यांच्यात जीव गुंतवतो पण प्रत्यक्षात या वस्तू आपल्यात जीव गुंतवत नाहीत. या वस्तू कधी एकाकडे असतात. तर कधी दुसऱ्याकडे निघून जातात. या जगात शाश्वत असं काहीही नाही. संसाराची निर्मिती करणारा ईश्वर पृथ्वीवरच्या बारीक-सारीक गोष्टींकडे पूर्ण लक्ष ठेऊन आहे. तो सगळं जाणतो. पृथ्वीवरच्या प्रत्येक माणसावर त्याचं लक्ष असतं पण त्याच्याकडे कोणीही लक्ष देत नाही. तो सगळ्यांना आ-ळखतो पण त्याला कुणीही ओळखत नाही. या संपूर्ण जगात ईश्वराचं अस्तित्त्व आहे. एवढंच नाही, तर प्रत्येक माणसाच्या शरीरात दैवी शक्ती नांदत असते. देव आपल्या अंतरातच रहात असतो. पण आपण आपल्या आत डोकावून बघत नाही. माणूस या जगाला ओळखू शकत नाही तर जगनियंत्याला जाणून घेणं, ओळखणं दूर राहिलं. त्याने आपल्या मायेने या जगाची निर्मिती केली. या निसर्गात त्याने सौंदर्य भरलंय. झुळझुळू वाहणाऱ्या नद्या, उंच पर्वत, झाडं, झुडपं, आकाश या सगळ्याची निर्मिती कोणी केली? या जगाला एवढं सौंदर्य कोणी दिलं? हे जग परिवर्तनशील आहे. बदल हा निसर्गनियम आहे. जे आज आहे ते उद्या टिकून राहणार नाही. जे उद्या आहे ते परवा नसेल. हाच संसाराचा नियम आहे आणि या नियमानुसारच सगळं काही सुरू आहे. म्हणूनच हा नियम जाणून घेऊन माणसाने परिवर्तनशील असलं पाहिजे. कोणत्याही गोष्टीच्या मोहात अडकून पडू नये. सत्याच्या शोधात रहावं. सत्याचा शोध घेतला की माणूस सन्मार्गाला लागू शकतो.



